# ॥ चैतन्य लहरी ॥

मार्च-एप्रिल क्र. ४-५ सन १९९७



तुम्ही दुसऱ्याला चैतन्य दिले नाहीत, दुसऱ्यामध्ये परिवर्तन घडवून आणले नाहीत, दुसऱ्याचे आजार बरे केले नाहीत, त्यांना शुद्ध प्रेम कसे असते हे शिकवले नाही तर ध्यानाचा, स्वतःला स्वच्छ ठेवण्याचा, पूजेला येण्याचा काय फायदा? नुसते बरे वाटते, आनंद होतो एवढंच? असे सहजयोगी बेकार आहेत.

– श्री माताजी निर्मलादेवी

श्री गणेश पूजा

# श्री गणेश - पूजा

**प.पू. श्री माताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)**

**कबेला : १५ सप्टेंबर ९६**

आज आपण श्री गणेशांची पूजा करणार आहोत. मला वाटते की आज ही पूजा फार संयुक्तिक आहे कारण सर्वत्र, विशेषतः युरोप आणि अमेरिकेत, मानवामधील अबोधिततेवर सर्व बाजूंनी आक्रमण होत आहे. स्वतःमधील तसेच दुसऱ्यांमधील अबोधिततेला जपणे, त्याचा आदर करणे याला मानवी जीवनामध्ये किती महत्व आहे हे त्यांना समजतच नाही.

मानवी जीवन हे इतर प्राण्यांच्या जीवनापेक्षां वेगळे आहे. प्राण्यांचे जीवन सर्वकाळ श्री शिव संभाळत असतात आणि त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे नियंत्रण होत रहते. म्हणूनच त्यांना 'पशुपति' ह्या नावाने ओळखतात. पण माणसाला स्वतःचा विवेक (स्वंतत्रता) मिळालेला असल्यामुळे स्वतःची उन्नति मिळवणे, योग्य काय त्याचा निर्णय करणे आणि सत्याचा शोध घेणे ह्यांची क्षमता त्याच्याजवळ आहे. पण हे सर्व अबोधिततेमधूनच होण्यासारखे आहे. अबोधितता हाच आनंदाचा स्त्रोत आहे; त्याच्याशिवाय कुठल्याही वस्तूचा पुरेपूर आनंद तुम्ही मिळवू शकत नाही. आणि या अबोधिततेलाच आज आव्हान केले जात आहे.

ही अबोधितता सूक्ष्मपणें, तुमच्या नकळत नष्ट करण्याचे दुष्कर्म करणारे विरोधी, क्रूर, गुन्हेगारी प्रवृत्तीचे बरेच लोक आहेत त्यांच्या डोक्यावर भुते चढली आहेत एरवी ते तसं करणारे नाही कारण मुळांत ते हुषार लोक असतात. ते भयानक प्रकार सुरू करतात. म्हणून एका अर्थाने त्यांना अक्कल नाही असे तुम्ही म्हणूं शकणार नाही. पण हे भयानक धंदे करण्याची माहिती व ज्ञान त्यांना कुठून मिळते?

सहज-योगाप्रमाणें या कलियुगांतही जन्माला येण्याचे प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. पूर्वी असे नव्हते म्हणून की काय आजकाल वेगवेगळया प्रकारचे दुष्ट लोक जन्माला येत आहेत. ह्या दुष्ट लोकांचे हीन विचार आजूबाजूला पसरतात आणि एकदां ते लोकांच्या डोक्यांत शिरले की तेही त्यांच्याप्रमाणे बिघडत जातात. अगदी सज्जन माणूसही त्यामधे वाहवत जातो. संत-माणूसही त्यामध्यें हरवून जाण्याची शक्यता आहे.

सर्वप्रथम आपण हे लक्षात घ्यायला हवे की आपल्याला हा जन्म फार कठिण काळांत मिळाला आहे. ख्रिस्तांच्या काळी त्यांच्याबरोबर जाणारे खूप थोडेच लोक होते आणि त्यांना कुण्डलिनीबद्दलही कांही माहिती नव्हती. त्यांना हेहि माहीत नव्हते की ख्रिस्त हे गणेशांचेच अवतार होते. ख्रिश्चन देशांमधेच अबोधिततेवर होणारा हा हल्ला व अपमान अगदी उघडपणे स्वीकारला जातो आणि कायदेशीरही समजला जातो. म्हणून अशा भयंकर परिस्थितीला तोंड देण्याची जेव्हां आपल्यावर वेळ येते तेव्हा आपल्याला आपल्यामधील आत्मिक शक्ति बळकट करावलाच पाहिजे. मी आज जेव्हां इथें आले तेव्हा वारा अजिबात बंद पडला होता तेव्हा तुमच्यामधून चैतन्याचा स्रोत एवढया प्रकर्षाने वहात होता की माझ्या लगेच लक्षात आले की परमेश्वराची ही शक्ती कार्यान्वित झाली आहे, ती प्रकट होउ लागली आहे. एरवी माझ्याकडे वारा येत नाही कारण तो नेहमी माझ्यामधून अजूबाजूला वहात असतो. पण त्यावेळचा वारा इतका जोरदार होता की मला कुणाचा तरी हात धरणें भाग पडले. तुमच्याजवळ ही जी सामुहिक शक्ती आहे ती तुमच्यापासून दूर जाणार नाही याची तुम्हाला पराकाष्ठेची काळजी घ्यायला हवी अबोधिततेचा आदर ठेवला पाहिजे हे तुम्हीच सिध्द करून दाखवायला हवे.

आदिशक्तीनें प्रथम श्रीगणेश निर्माण केले हे कशासाठी? तर तिला सर्व वातावरण चैतन्यमय करायचे

होते. पावित्र्य, मांगल्य सगळीकडे पसरवायचे होते; चैतन्य अजूनही कार्य करत आहे पण आजकालच्या या सुधारलेल्या लोकांच्या मनांत त्याचा शिरकाव होत नाही कारण अबोधितता म्हणजे काय म्हणतात हे त्यांना ठाऊक नाही. अबोधितेमधून नीतिमत्ता उदयाला येते; किंबहुना नीतिमत्ता असणें हे अबोधित असल्याचेच परिमाण आहे. ज्याच्याजवळ अबोधिता आहे तो माणूस अनीतिमान असूंच शकत नाही.

एकदां मी रशियाला गेले होते आणि कस्टममधून येत होते. त्यांनी मला विचारले की प्रवासांत तुम्हाला काही मिळालं का तर मी हो म्हणाले. आश्चर्यचकित होऊन त्यांनी काय म्हणून विचारल्यावर मी म्हणाले 'चीज'. आणखी काय विचारल्यावर मी म्हणाले पुस्तके तर ते म्हणाले पुस्तके कशी घेतली? त्याला परवानगी नसते. मी कारण विचारले तर त्याला कस्टम भरावी लागेल असे त्यांनी सांगितले. तुम्ही त्याचे नियम वाचले नाही का असेही वर विचारल्यावर मी स्वच्छ नाही म्हणाले. मी अगदी निरागसपणे सांगितले. मी खरंच तसले नियम वाचले नव्हते. शिपिंग कॉर्पोरेशनच्या मुख्याधिकाऱ्याची ही पत्नी आलिशान गाडीतून जाणारी ही महिला इतकी साधी कशी असू शकते त्यांना समजेना; आणि त्यांतून मी चीज व पुस्तकेंच फक्त घेतल्याचे ऐकून ते आणखीनच चाट पडले.

हे सर्व कायदेकानून व रितीरिवाज माणसाला जखडून ठेवतात. त्यांचे मूळ आपल्या धर्माच्या कल्पनेमध्ये आहे. पण धर्माचे मूलतत्त्व अबोधितताच आहे. सर्व नियम या अबोधिततेचे रक्षण करण्यासाठीच केलेले असतात; गुंडांना शिक्षा करण्यासाठी नसतात. जेव्हा एखादी व्यक्ति निरपराधी असल्याचे सिद्ध होते तेव्हा ही अबोधितताच तुमचे रक्षण करत असते. मी फार साधी असल्यामुळे मला हे आयुष्यात खूप वेळा दिसून आले की मला कसला प्रश्नच पडत नाही, कधीही तशी वेळ येत नाही. अबोधित माणसामधून चैतन्यलहरी प्रभावीपणे चालत असतात. अगदी एखाद्या लहान मुलाची व्हायब्रेशन्स बघाल तर शंभर मोठ्या सहजयोगी माणसांच्यापेक्षा ती जास्त असतात; पण तीच मुले वयाने मोठी होत जातात तेव्हा त्यांची अक्कलही वाढते आणि सुजाण होता होता त्यांच्यातील अबोधिता नाहीशी झाल्यासारखे वाटू लागते. चलाख बनणे, हुशारी मिळवणे, याला "वाढ" होणे म्हणत नाहीत तर ते सर्व स्वतःचेच नुकसान करण्यासारखे असते.

ज्या लोकांनी अशा चुका केल्या आहेत त्यासर्वांनी सदाशिवांची किंवा आदिशक्तीची क्षमा मागितली पाहिजे. पण श्रीगणेशांचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते कधीच क्षमा करत नाहीत. त्यांचा तुम्ही अपमान केलात किंवा त्यांना त्रास दिला तर ते तुम्हाला शिक्षा करणारच. म्हणूनच सध्या एड्ससारखे भयानक रोग पसरू लागले आहेत. हे सर्व घडायला कारण लोकच कारण ते जणु परमेश्वराकडून काय वाट्टेल ते करण्याची परवानगी मिळाल्यासारखे वागत आहेत. वर त्यांना त्याच इतका गर्व चढला आहे की त्यांना वाटते की आपण काहीही केले तर आपल्याला त्याचा त्रास होणार नाही. जगात इतक्या घडामोडी व उलथापालथ चालली असूनही लोक अनीतीच्या मार्गाकडे अगदी उजळ माथ्याने चालले आहेत आणि त्याचा त्यांना अभिमानही वाटतो. मी पाहते की शिकली-सवरलेली माणसे असे गलिच्छ विनोद करत असतात की रस्त्यात, लोक मवालीच वाटावेत. हा रोग तरुण लोकांपेक्षा आणि मुलांपेक्षा मोठ्या माणसांमध्ये पसरला आहे. मला वाटते की मोठ्या माणसांना लहान मुलांचा हेवा वाटू लागला आहे, नाही तर ते लहान मुलांवर कसा हल्ला करू शकतात? त्यातून त्यांना काय मिळते? या मत्सरापोटी ते अगदी घाणेरड्या प्रकारांनी मुलांना छळतात. मग श्रीगणेश त्यांना कधीच क्षमा करणार नाहीत. प्रथम ते अशा लोकांना उघडे पाडतील. मग त्यांना अनेक जन्म शिक्षा भोगावी लागेल. त्यांना आणि त्यांच्या मुलाबाळांना शाप मिळतील. हीच श्रीगणेशांची आज्ञा असते. पण जर त्यांच्या आईने किंवा वडिलांनी क्षमा करायला सांगितले तर ते ऐकतील; आईची आज्ञा ते शिरसावंद्य मानतात, तिला ते उलट प्रश्न करत नाहीत किंवा उलट उत्तरही कधी देत नाहीत; ते गणाधीश म्हणजे सर्व गणांचे अधिपति आहेत तरीही आई काय म्हणेल ते ऐकतात; अगदी लहान मुलाने ऐकावे तसे. आईला कधी विरोधही करत नाहीत. आईने त्यांची परीक्षा घेण्यासाठी काही जाणून-बुजून केले तरी त्यांच्या मनात शंकाच येत नाही. आईच्या मायेमध्येही ते कधी गुंतू शकत नाहीत कारण ते खूप अबोधित आहेत. ताक घुसळून लोणी काढल्यावर ते कधी पुन्हा ताकात विरघळत नाही त्याप्रमाणे हे बालगणेश आईच्या मायेमध्येही विरघळत नाहीत. माया ही लोकांची परीक्षा घेण्यासाठी आहे आणि परीक्षा द्यावीच लागते. आजकाल लोक इतके चालाख व अक्कल-बहाद्दूर झाले आहेत की, आदिशक्तीलाही कधीकधी त्यांचा कावा ओळखणे अवघड

होते. अशा तऱ्हेने ते तुम्हाला चकवतात. पुष्कळजणांनी मला असं फसवले आणि आता ते त्यांच्या जागेवर परत आले आणि हे मी नव्हे तर श्रीगणेशच करतात. आजुबाजूला सगळीकडे ते सारं लक्ष ठेऊन आहेत. तेव्हा तुम्ही काही भलतं करण्याच्या फंदात पडलात तर ते कडक शिक्षा ठोठावतील आणि मग मीही काही करू शकणार नाही. आता येशू ख्रिस्तांनी अवतार म्हणून जन्म घेतला. ख्रिस्त फार चपळ होते, श्रीगणेश लठ्ठ व लंबोदर आहेत म्हणून त्यांना शिक्षा करायला वेळ लागतो पण ख्रिस्त खूप तडफदार व चपळ असल्यामुळे मलाच लोकांना सांगावे लागले की त्यांच्या विरोधात जाऊ नका आणि माझ्याविरूद्ध काही वरळलात तर ते तुमची गय करणार नाहीत. म्हणजे एका बाजूने श्रीगणेश आहेत व दुसऱ्या बाजूने येशू ख्रिस्त आहेत. आणखी दोघेजण आहेत. ते म्हणजे Michael व Gabriel - संस्कृतमध्ये त्यांची नावे भैरव व हनुमान आहेत आणि त्यांनी महावीर व बुद्ध हे अवतार घेतले.

बुद्ध म्हणाले होते की तुम्ही कशावरही आसक्त होऊ नका; तुमचा पैसा, संपत्ति, कुटुंब इ. कशातही आसक्ती ठेऊ नका. त्याकाळी ह्या आसक्तींचे फार थैमान चालले होते आणि त्यांना लोकांच्या डोक्यातून ती आसक्ती पूर्णपणे काढून टाकायची होती. कपडे बदलून भगवी वस्त्रे घालून, मुंडन करून हे होत नाही कारण ते सर्व बाह्यात असते. त्याला वैराग्य म्हणत नाही.

त्यांनी हे सांगितले की माणसाने आतून निरासक्त व्हायला पाहिजे. आतून विरक्त होणे हे बाह्य-विरक्तीपेक्षा खूप वेगळे आहे. अमुक इतके उपास केले तर तुम्ही ख्रिस्तासारखे होता. महावीरासारखे राहिलात तर त्यांच्यासारखे होता किंवा बुद्धासारखी भगवी संन्यासी वस्त्रे वापरून बुद्ध होता असा हा प्रकार नाही. लोकांना या संतपुरूषांनी काय शिकवले आणि लोकांनी त्याबद्दलच्या काय खुळ्या कल्पना करून घेतल्या! तो काळ तपस. (पश्चात्तापयुक्त तपस्या) करण्याचा होता म्हणून तपश्चर्या करून आपली उन्नति साधण्याचा मार्ग त्यांनी सांगितला. ख्रिश्चन धर्मामध्ये पण फादर-मदर-नन्स इ. प्रकार सुरू झाले. हे सर्व कृत्रिम आहे आणि हे केल्यामुळे तुम्ही अबोधित व्हाल असे तुम्ही समजाल का? ही सर्व पाद्री मंडळी आज उघडे पडत असल्याचे तुम्हाला माहीतच आहे, त्यांना आता दूर केले आहे. त्यांनीच माणसामधील अबोधितेवर आक्रमण केले. बौद्ध लोक तर सगळ्यात वाईट कारण ते सांगायचे की सर्व काही सोडून द्या, म्हणजे सर्वस्वाचा त्याग करा आणि भीक मागा. या विरोधात्मक वागण्याला तुम्ही काय म्हणाल? काहींना तर अहंकार वाढू नये म्हणून भीक मागणे बरे वाटते! खरं तर हे अवतारी पुरूष सर्वांनी निरासक्त व्हावे, नीतिमत्ता वाढावी म्हणून जन्माला आले. तुम्ही जर लैंगिक सुखाबद्दल, आर्थिक परिस्थितीबद्दल एवढंच नव्हे तर तुमच्या देशाबद्दलही आसक्ती सोडून देऊ शकलात तर अशा निरासक्त व्यक्तिमत्वातून अबोधिता साकार होईल आणि भांडणतंटे उरणार नाहीत. पण होतंय ते सारं याच्या उलट. इस्लामची पण तीच कथा. तेही अगदी दुसऱ्या टोकाला गेले आहेत. मोहम्मदसाहेबांनी नीतिमत्तेचाच आग्रह धरला; त्यांना कुठल्याही प्रकारची अनीती पसंत नव्हती. त्या काळी स्त्रियांची संख्या खूप असल्यामुळे दुसरं लग्न करून दोन बायका ठेवायची पद्धत मानली; पण ते कधीही असं म्हणाले नाहीत की वेश्याव्यवसाय करा किंवा पापाचरण केले तरी चालेल ती फक्त एक 'समयचाल' होती; त्यावेळी परिस्थिती बिकट होती आणि घटस्फोटाला परवानगी नव्हती. सहजयोगात मात्र घटस्फोट मान्य आहे.

आजकालच्या जमान्यात मला दिसते की घटस्फोटाशिवाय त्यांचे चालत नाही कारण कधी कधी स्त्रिया फार कठोर होतात तर कधी कधी पुरूष फार हलक्या वृत्तीचे होतात. अशा परिस्थितीत त्यांच्यामध्ये सुसंवाद कसा होणार? या बाबतीत जास्त स्त्रिया अनीतीच्या वाटेने जात असतात. स्त्री नुसतीच अबोधित – स्तर नाही तर एक शक्ति आहे पण आजकाल स्त्रियासुद्धा निर्लज्जपणाने वागत आहेत; स्वतःच्या अबोधितेचा जी आदर करू शकत नाही तिची शक्ति कशी राहणार? ती जर व्यभिचारी झाली तर तिची अबोधिता संपलीच कारण नीतिमत्ता हीच तिची शक्ति आहे.

श्रीगणे ही पवित्रता धारण करतात व पसरवतात. या हॉलिवुड मंडळींनी तर आपल्या डोक्यात अशा भरमसाट कल्पना घुसडल्या आहेत की आपण त्यांचा सरळ-सरळ स्वीकार करतो आणि विसरतो की त्यामुळे श्रीगणेश नाराज होतील व आपल्याला शिक्षा करतील. सुरवातीला ते अगदी खालच्या पातळीपासून सुरू होते जेव्हा आपण आपल्या मुलांचा तिरस्कार करू लागतो. मुलांना जेव्हा आपण समजून घेत नाही तेव्हापासून या समस्येची सुरुवात होते. मी इंग्लंडमध्ये गेले होते तेव्हा सांगितले गेले की तिथे आठवड्याला दोन मुले आई-वडिलांकडून मारली जातात.

त्याक्षणीच ते (श्रीगणेश) कधीही शंका घेत नाही आणि कधीही गुंतून रहात नाहीत. पुष्कळ लोक मला सांगतात की माताजी, आम्ही असं केले, उंच चढाईवर असूनही आम्ही तिथे चढत गेलो आणि आम्ही फक्त एकाच माणसाला जागृति दिली. संपले, काय फायदा, देऊ नका जागृति! मी हजार वेळा सांगत असते की तुम्हाला तुम्ही स्वतः काही कार्य करता असं वाटत असेल तर काहीही करायची जरूर नाही; असं काम करण्याने काहीही साधत नाही. उलट आनंदाने करा, गंमत-आनंद मिळवा. श्रद्धेने करा. अशी पुरेपूर श्रद्धा असली की तुम्हाला मुळीच थकवा येत नाही. कसला त्रास होत नाही श्रीगणेशाकडे पहा. ही सगळी बंधने कोण पोचवीत असेल तर श्री महागणेश महोदय. त्याचे पोट मोठे आहे पण ते गणांना नुसती आज्ञा करतात आणि हे गण, इतर कुठल्याही शास्त्रज्ञापेक्षाही कर्तबगार असतात. त्यांची कुणीही बरोबरी करू शकणार नाही. आजार बरे करण्याचे कामही ते तसेच करतात. एका महिलेचा मुलगा मेक्सिकोमध्ये होता. तो आजारी होता आणि त्याला म्हतारपणी त्यांच्या घराण्यात अनुवंशिक पण दुर्धर असणारा रोग तरूण वयातच झाला. हा तरूण हार्वर्डमध्ये शिकत होता. त्या बाईने मला तीन पत्रे पाठवली आणि सारखी लिहायची की माताजी, मी काय करू? त्याला तुमच्याकडे पाठवू का? मी त्याबद्दल नुसता विचार केला आणि त्याचवेळेस चौथे पत्र आले; त्यात तिने कळवले की तिने त्या मुलाला हार्वर्डमधील एका हॉस्पिटलमध्ये दाखवले नंतर आणखी एका मोठ्या हॉस्पिटलमधून तपासणी करून घेतली आणि सगळ्या डॉक्टरांनी निर्णय दिला की हा मुलगा आता पूर्ण बरा झाला आहे. हे तिच्या श्रद्धेमुळे, आईच्या श्रद्धेमुळे झाले. माझ्याबद्दल शंका घेणे सोपे आहे, अशी शंका घेणे म्हणजे निसरड्या जमिनीवर चालण्यासारखे आहे. लोकांच्या मनात शंका असतात म्हणून ते जे काय ऐकले ते सांगतात. तुम्हाला आश्चर्य वाटेल की लहान मुले तुम्ही जेव्हा त्यांच्या आवडीचे काही दिले तर फार-फार खूष होतात; ती फार बुद्धिवान-मला खरं तर हा शब्द (Intelligent) आवडत नाही-असतात, म्हणून म्हणते की मुलांना एक सूक्ष्म समज असते.

माझी मोठी नात फार छान मुलगी आहे. मी तिला **Wendays House** घेऊन दिले आणि तिने ते तयार केले. मग तिने तिच्या आईला माझ्या मुलीला - ती खूप उंच आहे - त्या घरी बोलावले; ती गेली आणि ते सर्व घर मोडून टाकले. मग ही नात माझ्याकडे येऊन सांगू लागली "बघा, तुमच्या मुलीला तुम्ही काही रीत शिकवली नाही" का, काय झाले असं मी म्हटल्यावर ती म्हणाली "ती माझ्या घरी आली आणि शिष्टासारखे विचारू लागली की खायला काय आहे. दुसऱ्याच्या घरी गेल्यावर असं कुणी विचारणं चांगले असते का? आणि मी तसं म्हटल्यावर ती एवढ्या मोठ्याने हसायला लागली की माझं घरच मोडून गेलं. असं कुणी वागतात का?" आता हे सर्व किती निरागस आहे पहा. अशावेळी तिला खूप करण्याकरता तुम्ही एखादी लहानशी गोष्ट जरी केली तर त्याचा उपयोग होतो. इतके हे साधे आहे.

आता कुंडलिनी शक्तीबद्दल हाही एक प्रश्नच आहे. ती श्रीगणेशाची शक्ती आहे आणि त्यांच्या परवानगीशिवाय ती वर येणारच नाही काय अवघड गोष्ट! उदा. माझी मुलगी म्हणाली की मला विचारल्याशिवाय तू घराबाहेर कुठे जायचे नाही तर काहीच करणं अशक्य आहे. तुम्ही घरातच अडकून बसणार तसेच श्रीगणेशांची परवानगी घेतल्याशिवाय कुंडलिनी वर येणार नाही. तसं करणं नुसते अवघड नाही तर अशक्य आहे. मूलाधारला काही होणार नाही, हृदयाची धडधड जशी चालू राहते तसं ते चालूच राहणार पण कुंडलिनी वर येणार नाही. कुंडलिनीला तशी इच्छा झाली तरी श्रीगणेशा तिला तसं करू देणार नाही. जे लोक चारित्र्यहीन, अनीतिमान असतात व नीतिबाह्य वागतात आणि वर दुसऱ्यांचे गणेशतत्त्व खराब करतात त्यांना जागृति मिळणे फार अवघड आहे. पण मी पाहिले आहे की अशा लोकांपैकी जे क्षमा मागतात आणि माताजी श्रीगणेशांना त्यांना क्षमा करायला सांगतात त्यांना जागृति मिळते. ते तुम्हाला क्षमा करणारच. माय-लेकामधील हे सुंदर नाते आहे. एक प्रकारे हे चांगले आहे, नाही तर त्यांनी आज जगातील ९० टक्के लोकांना मारून टाकले असते. तर हे असं वरदान आणि आशीर्वाद आहे की आपण आपल्यामधील गणेशतत्वाची काळजी घेतली, स्वतःला स्वच्छ ठेवले, नजर साफ ठेवली आणि आपापसात शुद्ध संबंध राखले तर आपल्याला कधीही कसला प्रश्न भेडसावणार नाही. तुमचे पत्नीत्व बरोबरचे संबंध चांगले राहतील, मुलाबाळांबरोबरचे संबंध, समाजातील संबंध, राजकारण, अर्थकारण इ. याबीमधील प्रश्न इ. सर्व कार्यामध्ये तुमचा आतील विवेक तुम्हाला मदत करेल. तुम्हाला असंही वाटेल की लोक मला फसवत असतात पण त्यांना ते करू द्या आणि मग त्यांचे काय होते ते तुम्हीच बघा. त्यांना तुमच्या अबोधितेला

धक्का लावू तर दे आणि त्यातून काय मिळते ते त्यांचे त्यांनाच कळेल. तुम्हा सगळ्या माणसांचे मूलाधार चांगले झाले आहे आणि श्रीगणेश तिथे सुंदरपणे स्थापित झाले आहेत आणि तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे हे सर्व तुम्हा सर्वांना एक वरदान म्हणून मिळाले आहे. काल तुमही इतका आनंद मिळवला; अगदी लहान मुलांसारखे, जणु वय विसरल्यासारखे तुम्ही आनंद लुटत होता नाही का? ते नृत्य तालात होतं का नाही, ते विचित्रच तर नव्हते ना असं काहीच तुम्ही पाहिल नाही. सगळं काही आनंदमयच, त्या आनंदला काही नियम, पद्धत वगैरे नसतात. ह्या आनंदाचा उगम आपल्या अबोधिततेमधून होत असतो; अबोधितेशिवाय मनाने किंवा हृदयापासून तुम्ही पूर्ण आनंद मिळवू शकत नाही. हृदयामध्ये श्री शिव असतात. तुम्ही पंधरा वर्षे पायावर उभे राहून "ॐ नमो: शिवाय:, ॐ नमो: शिवाय: असा जप केलात तर कदाचित श्रीशिव तुम्हाला काही वर देतील. श्रीशिवांना प्रसन्न करून घेणे फार अवघड आहे. जरी ते स्वत: भोळे असले तरीही अवघड. ते इतके भोळे आहेत की जसे पांढरे शुभ्र कापड, तुमच्या चारित्र्यावर एखादा लहानसा डाग पडला तरी शिक्षा. पण एखादा राक्षस २५ वर्षे पायावर उभा राहून त्यांचा जप व स्तुति करत राहिला तर कदाचित क्षमा करतील. सहजयोगी क्षमा करत नाहीत. मात्र क्षमायाचना करायला एकच देवी म्हणजे श्री माताजी आणि त्या सदैव क्षमाच करतात. क्षमा न करण्यामुळे होणारी डोकेदुखी मला नको. तुम्ही जेव्हा क्षमा करत नाही तेव्हा तुम्हाला डोकेदुखी होते आणि मला ते नको आहे. सर्व सहजयोग्यांना मी नेहमीच क्षमा करते. आपल्याकडेही काही खराब, वाईट लोक आहेत; पण मी त्यांच्यावर रागवत नाही कारण मग श्रीगणेश त्यांना खतम करतील. तसं ते आपणहून करतातच पण इतक्या तडकाफडकी ते तसं करणार नाहीत. कारण त्यांनी मला माताजी म्हटले आहे आणि मी त्यांना मान देते. लोकांनी खूप त्रास दिला आहे यात शंका नाही आणि तुम्हाला त्यांचा राग येतो हेही मी जाणते. पण क्षमा करणे ही त्यांना शिक्षाच आहे आणि त्यामुळे त्यांची चूक त्यांच्या लक्षात येते. शिवाय १०० पैकी ९९ लोकांना शिक्षेपेक्षा क्षमा आवडते.

श्रीगणेशांचे कार्य हे असे आहे आणि ते सतत तुमच्याजवळ आहेत. तुमच्यातील श्रीगणेश आता जागृत आहेत. पण काही लोक असे आहेत की त्यांना जागृति मिळते, व्हायब्रेशन्स मिळतात पण नंतर ते आपल्या उद्योगात गुरफटून राहतात. बायका आपल्या पोरांमध्ये गुंतलेल्या. त्यांना सहजयोगाचं काम करायला वेळ नसतो. स्वच्छता दिवसभर करत राहतील पण कशा करता? उदा. ही काच (पेला) पुन्हा पुन्हा स्वच्छ केला आणि वापरला नाही तर त्याला काय अर्थ? ते स्वत: ध्यान करतील, स्वत:ला स्वच्छ करतील पण एरवी व्हायब्रेशन्स दिलीच पाहिजेत. तुम्ही दुसऱ्याला चैतन्य दिले नाहीत. दुसऱ्यांमध्ये परिवर्तन घडवून आणले नाहीत. दुसऱ्यांचे आजार बरे केले नाहीत, त्यांना शुद्ध प्रेम कसे असते हे शिकवले नाही तर ध्यानाचा, स्वत:ला स्वच्छ ठेवण्याचा, पूजेला येण्याचा काय फायदा? नुसते बरं वाटते, आनंद होतो एवढंच? असे सहजयोगी बेकार आहेत. गणेश तसे नाहीत. असे लोक घेऊन काय उपयोग? ही पूजा साक्षात्कारासाठी आहे, ही त्यांची पूजा आहे. समजा ते तुम्ही आशीर्वाद मागण्याची वाट पहात आहेत, तर ते काय आशीर्वाद देतील? त्यांचे आशीर्वाद म्हणजे आत्मसाक्षात्कार देणे, कुंडलिनीचे उत्थापन घडवणे. जे मागाल ते मिळणार आहे. तुम्ही आरोग्य, अमकं-तमकं सारं मागता मग श्रीगणेशांना असं का नाही मागत की हे श्रीगणेशा, आम्हाला सहजयोगाच्या कार्याचे उत्तम उपकरण बनवा, लोकांना जागृति देण्याची व त्यांना सहजयोग सांगण्याची शक्ति आम्हाला द्या. तुमच्यापैकी बरेच जण सहजयोग सांगायलाही तयार नसतात. आम्हाला लाज वाटते म्हणे, त्यात लाजण्यासारखे काय आहे? मी एकदा आगगाडीने प्रवास करत होते आणि माझ्या शेजारी एक महिला प्रवासी होती. ती कुठल्या तरी पंथाची होती आणि सबंध वेळ तिने माझा पिच्छा पुरवला. मला झोप यायला लागली, पण जराशी जागी होते तर तिची त्या पंथाची बडबड सुरू. मी म्हणाले सहजयोगी असं कधी करणार नाहीत. तुम्ही त्याबद्दल बोलले पाहिजे. कसली भीती वाटायला नको. श्रीगणेश तुमचे रक्षण करतील, तुम्हाला मदत करतील आणि प्रसन्न होतील, ते तुमच्यासाठी सर्व कार्यान्वित करतील, सर्व प्रश्न सुटतील, सर्वकाही होईल. त्यांच्या या वृत्तीबद्दल खात्री बाळगा. तुमच्या माताजींवर विश्वास ठेवा. हाच श्रीगणेशांचा संदेश आहे.

ईश्वराचे तुम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद.

# ख्रिस्मस पूजा

## प.पू. श्री माताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

### गणपतीमुळे २५ डिसेंबर ९६

येशू ख्रिस्तांचा जन्म ही एक फार मोठी प्रतिकात्मक घटना आहे; अगदी गरीबातल्या गरीब माणसाचाही होणार नाही अशा एका गोठ्यात त्यांचा जन्म झाला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत असल्याने त्यांना वाळलेल्या गवतावर झोपावे लागले. पण त्यांचा जन्मच (जीवन) हेच दाखवतो की अवतारी पुरुष किंवा उन्नतीच्या उच्च स्थितीमधील लोक शारीरिक सुखाबद्दल पूर्णपणे उदासीन असतात. त्यांचा संदेशच इतका महान व गहन होता की त्यांचे शिष्यसुद्धा त्यांच्या शिकवणीप्रमाणे संघर्ष करण्यासाठी तयार झालेले नव्हते.

प्रेम व क्षमा हा त्यांचा संदेश सर्व साधू-संत देतात. सर्व अवतारपुरूषांनी व प्रेषितांनी प्रेम व क्षमा हीच शिकवण दिली. ज्यांचा त्याला विरोध होता किंवा ज्याला त्याची उपयुक्तता पटत नव्हती त्यांना त्यावर विश्वास ठेवण्यास सांगितले गेले. त्यावेळी लोक साधेसुधे असल्यामईळे त्यांनी त्यांची अनुज्ञा पाळली; त्यातले काही शिष्य फार चांगले होते. काही अर्धवट होते तर काही थोडे साशंक होते.

आपले आज्ञा चक्र तयार करण्यासाठी त्यांचे अवतरण झाले आणि त्यांनी अपरंपार कष्ट करूनही आपल्याला असे दिसते की विशेषतः ख्रिश्चन लोकांचे आज्ञा-चक्र फार खराब असते, ते फार आक्रमक वृत्तीचे खप विचार व योजना आखणारे व भविष्याचा जास्त विचार करणारे असतात. उजव्या बाजूचे जे सर्वसाधारण दोष असतात ते ख्रिश्चन म्हणवणाऱ्या देशातील लोकांमध्ये सापडतात.

ख्रिस्ती धर्मामध्ये सुरवातीच्या काळात जे खरोखर ज्ञानी (Gnostics) लोक होते त्यांचा ख्रिश्चन धर्माधिकारी म्हणवणाऱ्या लोकांकडून फार छळ झाला आणि त्यांना दाबून ठेवले गेले. ख्रिश्चन पाद्री आणि चर्च-संस्थेतील अशा लोकांनी पण त्यांना खूप त्रास दिला. अजूनही ते चालूच आहे. पाश्चात्त्य देशांमध्ये अजूनही आपल्याला हेच दिसून येते की सर्वसाधारण जनमानसावर या चर्च-संस्थेचा खूप पगडा आहे.

एरवी ते लोक फार बुद्धिवान, काटेकोर शास्त्रीय विचारसरणीचे व शूर आहेत पण मंदिरे, चर्च, धर्म किंवा ख्रिश्चन-धर्म या विषयाबद्दल मात्र मतिगुंग झालेले आहेत. आपल्याकडील लोकांचे काही चुकत असेल हा विचारही त्यांच्या डोक्यात येत नाही. मी इटलीमध्ये गेले होते तेव्हा त्यांच्या कॅथॉलिक चर्चमधले आपल्या देशात बघायला मिळणार नाहीत इतके भयंकर अनागोंदी व भ्रष्टाचारी प्रकार पाहून मी थक्कच झाले. पैशाचे अपव्यवहार, स्त्रियांची विटंबना, अनौरस संतति असले घाणेरडे प्रकार तिथे राजरोस चालतात. ते लोक स्वतःला फादर-मदर-सिस्टर असे म्हणवताना ख्रिस्ताच्या नावाखाली असे धंदे कसे करू शकतात? ख्रिस्तांनी आपल्या शिकवणुकीतून व जीवन-कार्यातून हे दाखवायचा प्रयत्न केला. लंडनमधील एखाद्या भव्य हॉस्पिटलमध्ये आरामात जन्म घेण्याचीच काही जरूर नाही. त्यांच्या स्वतःच्याच अगदी साध्या जन्माची गोष्ट पाहूनच ख्रिश्चन लोक तसेच साधे व्हायला पाहिजे होते पण ते तर उलट सर्व काही पैशामध्ये तोलणारे आज आहेत. पैशासाठी ते दूर-दूर गेले आणि त्या-त्या प्रदेशातील लोकांचा संहार केला. ब्राझील, चिली, अर्जेंटिना या देशात गेलात तर तिथे मूळचा आदिवासी एकही मनुष्य तुम्हाला दिसणार नाही इतके हे लोक त्यांच्याशी विश्वास बसणार नाही इतके क्रूरपणे व आक्रमक पद्धतीने वागले. इंग्लंडमधल्या प्रॉटेस्टंट लोकांचीही तीच तऱ्हा, सकाळपासून संध्यकाळपर्यंत तुम्ही

सारखे थँक-यू. थँक-यू असे नाही म्हटले तर त्या जातीतून तुम्ही खलास. ख्रिस्तांना कुठली जात होती का? ते सावळे होते का? नाही तर गोरे होते का? मुळीच नाही. ते भारतीयांसारख्या वर्णाचे होते. पाश्चात्यांमध्ये ही जातपात कुठून आली? खऱ्या ख्रिश्चन धर्मामध्ये याचा ख्रिस्तांशी काही संबंध नाही.

तुम्ही कुठेही जा, साध्या-भोळ्या भाविक लोकांचा हे चर्चमधले लोक वाटेल तसा उपयोग करून घेतात. मतदानासाठी त्यांना वापरतात. पैशासाठी त्यांचा उपयोग करून घेतात. खोटेनाटे पैसे हे चर्चमधेच बनतात. इतका एकाधिकार, इतकी शिस्त, इतकी हुकूमशाही की काय वाट्टेल ते केले तरी पोपसाहेबांचं कधीच काही चुकत नाही. त्यांनी काहीही केले तरी ते योग्य मानायचे. पापाची कसली जाणीव नाही, नरकाची भीती नाही, इतकचं काय ख्रिस्तांचे- जे साक्षात शुद्ध व अबोधित आहेत पण स्मरण नाही. एकदा ख्रिस्त मंदिरात बाजार मांडलेल्या लोकांवर हंटर उगारून मारू लागले कारण ते म्हणत देवाबरोबर खरेदी-विक्री नाही, तसे ते लोक इतर वस्तूंचाच बाजार भरवत होते पण मंदिराच्या पावित्र्याबद्दल त्यांचा आग्रह होता.

ख्रिश्चन लोकांनी आणखी एक प्रकार केला, तो म्हणजे ख्रिस्तांना मारल्याबद्दल त्यांनी ज्यू-लोकांना दोषी ठरवले. ते नेहमीच दोषारोप दुसऱ्यांवर करतात. ख्रिश्चन लोकांमध्ये स्वतः दुसऱ्याबरोबर केलेल्या अन्यायाचे खापर दुसऱ्यावर लादण्याची वृत्ती अजूनही आहे. तसे त्यांनी ज्यू लोकांना दूषण लावले. त्यावेळचे ज्यू लोक नंतर भारतात येऊन भारतीय झाले असावेत. त्यांचा पुनर्जन्मावर कदाचित विश्वास नसेल तरी ठीक आहे. दुसरी गोष्ट म्हणजे त्यावेळच्या ज्यू लोकांनाच तिथे पुन्हा जन्म मिळाला असं तुम्हाला म्हणायचे आहे का? तिसरी गोष्ट म्हणजे त्या एवढ्या गर्दीमध्ये ज्यू लोकांनीच ख्रिस्ताला मारले असं तुम्ही कसं ठरवू शकता? म्हणून ज्यूनी ख्रिस्तांना मारलेच नाही. खरं तर त्यावेळच्या न्यायाधीशानेच तो निर्णय घेऊन तशी आज्ञा केली. तो एक रोमन होता. रोमन साम्राज्याला त्याची जबाबदारी नको होती म्हणून ते म्हणाले की ज्यूनीच ख्रिस्तांना मारले. म्हणून हिटलरने सुद्धा ज्यू लोकांचाच छळ केला. स्वतःला कॅथॉलिक म्हणून लहान मुलांनाही गॅस-चेंबरमध्ये ठार मारणारा कसा होऊ शकतो हे समजत नाही. पण ज्यांचा असा छळ झाला तेच आता आक्रमक होऊ लागले आहेत व आज ते पॅलिस्टीनियन लोकांच्या विरोधात आहेत; पॅलेस्टिन लोकही मुसलमान असून त्या लोकांनीही सगळीकडे थैमान घातले आहे. ख्रिस्तांचे जीवन आणि इतिहास खोलवर जाऊन पाहिला तर हेच दिसून येते की एक आक्रमण झाले की त्यातूनच दुसरे आक्रमण सुरू होते. एकाने दुसऱ्याला थप्पड मारली तर तो मारणाऱ्याला ठार करण्याचा प्रयत्न करतो. धर्मामुळेच हा मत्सर व दुरावा निर्माण झाला आहे; देवाच्या व धर्मांच्या नावाखाली लोक एकमेकांचा खून करत आहेत. सहजयोगातही लोक आता माझं नाव घेऊन गैरमार्गाला लावणाऱ्यांचे ग्रुप बनवत आहेत. तुमच्यावर तसा प्रसंग येणार नाही याची काळजी घ्या. जे प्रत्यक्ष प्रेमशक्तीचे अवतरण होते त्या ख्रिस्ताचे नावाखाली लोण अत्याचार, मत्सर, द्वेष, फसवणूक अशी वाईट कामे करत आहेत. हे लोण एकाकडून दुसऱ्याकडे पसरते आणि सहजयोगातही त्याचा शिरकाव झाला आहे. मी जर एखाद्याला लीडर म्हणून बदलला आणि दुसरा लीडर नेमला तर लगेच त्याला राग येतो आणि सहजयोगातून आपल्याला किती फायदा मिळाला हे विसरून जातो. साफ विसरतो. नुसते दुसरा लीडर नेमणार आहे असं सांगितले तरी एकदम खलास सहजयोगानेच त्याला सर्व काही दिले, त्याचे सर्व चांगले झाले. सहजयोगाच्या कृपेनेच तो जिवंत आहे हे सारे काही विसरतो. लीडर केल्यावर ती हवाच त्यांच्या डोक्यात शिरते. सहजयोगात लीडर बनवण्यासाठी तुम्हाला कधीच आणले नाही. लीडर नेमणे ही फक्त एक सोईसाठी केलेली व्यवस्था आहे आणि एखादा लीडर बिघडत चालला तर त्याला बदलायला हवे इतकाच त्याचा अर्थ. इतके हे सरळ आहे. पण सत्ता मिळवणे ही चुकीची समजूत असल्यामुळे एकदा ती मिळाली की तिचा वाट्टेल तसा वापर केला जातो. हे प्रत्येक देशात चालले आहे आणि अजूनही चालत आहे ही फार खेदाची व क्लेशदायक गोष्ट आहे. माझ्या कार्यात त्यामुळे अडथळे येतील. सर्वांना सामूहिक पूर्णावस्थेला नेण्याचा माझा प्रयत्न आहे. तुमच्यामध्ये भेदभाव मला करायचा नाही. पण जे चुकीचे,

अयोग्य व अपवित्र आहे ते तुम्हाला दाखवून द्यायलाच हवे. घरातील स्त्री तांदूळ निवडतांना त्यातले खडे काढून टाकून देते तसं हे आहे. खड्यांसकट आपण भात करत नाही कारण ते खडेच राहणार. संत नामदेव अशा लोकांची माशीबरोबर तुलना करतात. माशी जिवंतपणी अन्नावर बेऊन आपल्याला त्रास देतेच. पण चुकून पोटात गेली तर मरूनही वर त्रासच होतो. अशा लोकांना सहजयोग समजणार नाहीच पण ते आपल्याला त्रास देतील. मग जे सहजयोगात प्रगत झाले आहेत त्यांनी काय करायचे? त्यांन पण त्यांचे अनुकरण करायचे का? मी कधी कुणाला दोष देत नाही. उलट लोक मला सांगतात "माताजी त्याने सहजयोगाला कधी पैसे दिले नाहीत म्हणून त्याची संपत्ति खलास झाली." मी कधी कोणाजवळ देणग्या मागत नाही. का कधी कशासाठी पैसे मागत नाहीत. दर वेळेस उलट म्हणते. देऊ नका. आपल्याजवळ खूप आहे. मला जरूर असली तरीसुद्धा मी कुणाकडे एक पैसादेखील मागत नाही. मला तसला प्रश्नच कधी पडत नाही आणि ते मला माहित आहे.

ख्रिस्तांच्या जीवनातून आपण हेच समजून घ्यायला हवे की त्यांना कधी कसले प्रश्न नव्हते. ते निर्भय होते. आपण देवपुत्र आहोत हे त्यांना माहित होते; म्हणूनच त्यांनी सुळावर चढवले गेले त्यालाही तोंड दिले. लोकांना ते आवडले असो वा नसो पण त्यांनी क्रॉस खांद्यावरून वाहिला. क्रॉस हे स्वस्तिकाचेच पण थोड्याफार फरकाचे प्रतीक आहे. ख्रिस्तांना तरीही आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली. त्यांनी हे प्राणार्पण आपल्या सर्वांसाठी केले ज्यामुळे आपण आज आज्ञा पार करू शकलो. दसुऱ्यांची निंदा करण्याऐवजी स्वतःची निंदा केलेली बरी. स्वतःला सुळावर देण्यासारखे ते आहे असे समजा कारण सहजयोगी म्हणून आपण कुठे ओहत हे तुमचे तुम्हालाच समजेल. मला सांगण्यात आले आहे की दुसऱ्या लोकांच्या अंकित झालेले ८०-९० सहजयोगी इथे आले आहेत. सहजयोगी व्यक्ती दुसऱ्याच्या प्रभावाखाली कशी येऊ शकेल? हे शक्य आहे का? पण कदाचित ते ध्यान करत नसतील; त्यांना ते कसं जमणार? आता ते क्षमा मागतात. मी क्षमा करेनही पण त्यामुळे ते ठीक होतील असे नाही; त्यांनी हे समजून घ्यायला हवे की आजपर्यंत ते सहजयोगी नव्हते. सहजयोगी जर असा भुकवला जाऊ लागला तर सहजयोगाचा फायदा काय? कुंडलिनी जागरणाचा फायदा काय? ख्रिस्त हे मानवजातीचे तारणकार म्हणून जन्माला आले. आपल्यासाठी या जगात जे शक्य होते ते सारे काही केले. पण आपण त्यांच्यासाठी काय केले? त्याचप्रमाणे बरेच सहजयोगी मागण्या करत असतात की माताजी, आम्ही तुम्हाला भेटू शकत नाही, तुमच्याशी हात मिळवू शकत नाही, तुमच्या पाया पडू शकत नाही, हे नाही ते नाही इ. इ. मला खरंच आश्चर्य वाटते. मी हे केले पाहिजे. ते केले पाहिजे अशी सारखी माझ्या मागे भुणभुण. तुम्ही फक्त ध्यान करायला पाहिजे. तेवढंच करा आणि हे परमचैतन्य ही माझीच शक्ती आहे आणि माझ्या शक्तीचीच जाणीव तुम्हाला आतमधून होत आहे यावर तुमची श्रद्धा बसेल. तुम्ही जितके माझ्यापासून दूर रहाल तितके तुमच्याच हिताचे आहे. काही सहजयोग्यांची मागण्या करण्याची ही सवय मला अजिबात समजत नाही. त्यांना जागृति मिळाल्याचे ते विसरलेत का?

ख्रिस्त हे केवढे महान अवतरण झाले आहे हे आपण समजून घ्यायला हवे त्यांना 'जागृति देता आली नाही ही गोष्ट वेगळी. त्यांना सुळावर चढवणाऱ्या लोकांची तुम्ही कल्पना करा म्हणजे अशा लोकांना 'जागृति' कशी मिळणार हे समजेल. माझ्यासमोर कुणी सुरा होऊन आला तर मी त्याला साक्षात्कार कसा देणार? त्यांचे कुणी ऐकले नाही. त्यांच्या म्हणण्याचा कुणी विचार केला नाही. पण तुम्ही आता साक्षात्कारी झाला आहात; द्विज झाला आहात. तुम्ही महान झाला आहात. तुमच्याजवळ मोठी क्षमता आहे. एवढे सगळे असूनही तुम्ही कसे आहात? सहजयोगाबद्दल खरी कळकळ व कार्यतत्परता किती जणांजवळ आहे? विचार करा. सगळयांना त्यांचे - त्यांचे व्यवसाय आहेत, हे आहे, ते आहे. पण कळकळीने काम करणारे किती आहेत? ख्रिस्तांजवळ फक्त १२ शिष्य होते आणि एक-दोन वगळता सर्व समर्पित होते. साक्षात्कार नसतानांही त्यांनी ख्रिस्त-धर्माचे श्रद्धेने कार्य केले आणि तो वृक्ष पसरला. पण त्यांना पूर्ण ज्ञानाची कल्पना नव्हती. त्याच्याबरोबर ख्रिश्चन धर्मांतरामधून आलेले बेकार लोक होते. म्हणून त्यांनी ख्रिस्त जन्माला साजेसे काही केले

नाही तरी ते समजण्यासारखे आहे. पण तुम्ही लोक द्विज झाला आहात, आत्मज्ञान तुम्हाला मिळाले आहे, सर्व शक्त्या मिळाल्या आहेत आणि सर्वव्यापी शक्तीबरोबर जोडले गेला आहात तरी तुम्ही असे कसे? तुम्ही सर्व शक्त्या वापरू शकता, ओळखू शकता, चालू झालेल्या एका इंजिनसारखे तुम्ही झाला आहात. काही चाके चालू झाली आहेत. पण मागे अनेक चाके आहेत आणि म्हणून तुम्हाला खूप करण्यासारखे आहे. मी ख्रिश्चन लोकांना दोष देत नाही. त्यांना कधी आत्मसाक्षात्कार मिळाला नाही; फार फार तर एखादा पाद्री त्यांच्यावर पाणी शिंपडून त्यांना द्यायचा. पण तुमचं काय? मी तुमच्यासाठी जगत आहे; आईबरोबर राहून तुम्ही प्रगल्भ झाल्याचं मला पाहायचे आहे. पुष्कळ जण तयार झाले असले तरी अजून खूप लोक तयार व्हायचे आहेत. म्हणजे तुम्ही उत्तम भाषण देऊ शकाल किंवा पुस्तके लिहाल हा त्याचा अर्थ नाही. पण आतून तुम्ही प्रगल्भ व्हायला हवे आणि तुमचे व्यक्तिमत्त्व एखाद्या फुलासारखे, ज्यामधून प्रेमाचा ईश्वरी सुगंध दरवळेल, असं बहरले पाहिजे. माझ्यात आणि ख्रिस्तांमध्ये हाच फरक आहे. ते म्हणाले "मला आता जास्त काही करायचे नाही; या मूर्ख लोकांची संगत पुरे झाली." माझं तसं होणार नाही, जग कसं आहे मला माहित होते. आज तर जगाची परिस्थिति आणखीच खराब आहे कारण सर्व नेतेमंडळी आपापसात भांडत आहेत. आजचे राजकारणी भ्रष्ट आहेत, भ्रष्टाचाराची जणू स्पर्धाच चालली आहे, सत्य व प्रामाणिकपणाचा त्यांच्याजवळ लवलेश उरला नाही. प्रत्येकजण जाहिरातबाजी, संपर्क-माध्यम, वर्तमानपत्र यात गुंतला आहे आणि ही साधनेच वाईट प्रवृत्तीला वढावा देत आहेत. हे सर्व असूनही मला खात्री होती की सन २००० पर्यंत सहजयोग हा एक अद्वितीय योग ठरणार आहे. तुम्ही मला माझे वाक्य पुरे करू दिले नाहीत, हे जेवढे इथे माझी सेवा करून आहेत तेवढे लोकही खरे सहजयोगी झाले तर! तुमच्या शहरात मी येऊ शकले नाही तरी काही बिघडत नाही, कशानेच काही बिघडत नाही. मुख्य गोष्ट कोणती असेल तर ही की तुम्हा लोकांना साऱ्या मानवजातीचे उत्थान करायचे आहे. सगळ्यांना एकत्र आणायचे आहे आणि सगळीकडे शांती, आनंद व सुख पसरवायचे आहे.

आज मी जेव्हा येत होते तेव्हा लोकांनी शाली पसरल्या. मला आठवण झाली कि ख्रिस्त यायचे तेव्हा लोक पाम-वृक्षाची पाने आणत आणि जमिनीवर त्यांच्यासाठी शाली पसरत पण ते कुठे गेले? ते क्रॉसवर, सुळावर मरणाला सामोरे गेले. तुम्ही माझ्याबद्दल जेव्हा प्रेम दाखवता तेव्हा लक्षात घ्या की तुम्हाला सहजयोगाच्या कार्याबद्दलही तितकेच प्रेम वाटले पाहिजे. आजकालच्या देशांमध्ये, जिथे ख्रिस्ति धर्माचा प्रभाव आहे, ते सर्वजण अवनतीला चालले आहेत कारण त्यांच्याजवळ नीतीमत्ता नाही. तिथे बेकारी आहे. अनेक समस्या आहेत, त्यांची मुले भरकटलेली आहेत. दारू-धुम्रपानाच्या आहारी जात आहेत, त्यांचा दुष्परिणाम आपल्यावरही होत आहे. हे सर्व ख्रिस्त-विरोधी कार्य आहे. ख्रिस्तांच्या विरोधात कुणी असेल तर तो आपल्यातच आहे कारण त्याला ख्रिस्तांच्या पावित्र्य व प्रेमाच्या विरोधातल्या या गोष्टी मान्य आहेत. ही मुलगी जी बुडून मेली ती तुमच्या निष्काळजीपणामुळे गेली. तिचे वडील कुठे गेले होते? लहान मुलाला असे सोडून कसे जाऊ शकतात मला समजत नाही. ही महत्त्वाची गोष्ट आहे. ख्रिस्तांनी सांगितलेच आहे की स्वतःवर जसे प्रेम करता तसं मुलांवर, शेजाऱ्यांवर प्रेम करा. पाश्चात्य देशांमध्ये तुम्हाला शेजारी मिळाला तर काही घडगत नाही. तो तुम्ही काय करता, कुठे जाता सर्व माहिती मिळवील, दुर्बिणसुद्धा त्यासाठी वापरेल आणि तुम्ही आवाज केलात तर संपलच; साधे गाणे म्हणालात तरी संपलेच. त्या बाबतीत भारतीय लोक चांगले आहेत. आमच्याकडे तसला आवाजाचा प्रश्न नाही. त्यांना तो चालतो. भारतीय लोक आवाजाशी कसे जमवून घेतात मला शोधून काढायचे होते. मला समजले की पाश्चात्य देशातील लोक सदैव ताणतणावाखाली असतात म्हणून त्यांना आवाज सहज होत नाही. पण भारतातील लोकांना टेन्शन म्हणजे काय हे तितकेसे माहित नाही, मला कळत नाही पण अजून तरी तो प्रकार इकडे फारसा वाढला नाही. पाश्चात्यांच्या मानाने कमीच आहे. म्हणून पाश्चात्य लोक आवाजाला इतके घाबरतात. भारतात खेड्यापाड्यातून राहणारे लोक स्टेशनवरच झोप घेतात, त्यांना काही होत नाही; गाड्या येत-जात असतात पण हे छानपैकी झोप काढतात. पण पाश्चात्य

देशांची कल्पनाच करा. देवकृपेने इटलीमध्ये आमचा शेजारी जरा दूर होता पण इंग्लंडमध्ये शेजाऱ्यांच्यामुळे आम्हाला बरेच वेळा इकडून दुसरीकडे असा आश्रम बदलावा लागला; त्यातही एक शेजार असा भेटला की त्याचे नाव **Mr. Peace** होते कुणी हे नाव त्याला दिले कोण जाणे; जीवनात त्यांच्यामध्ये इतका विरोधाभास, इतक्या प्रचंड दोन टोकांच्या वागणुकी की वाटायचे "शेजाऱ्यावर प्रेम करा" हा उपदेश ते कधी तरी आचरणात आणतील का? भारतीयांमध्ये हा त्रास फारसा नाही. कधी कधी झाला तरी फारसा नाही. शिवाय कुठे संगीताची बैठक असली तर शेजारपाजारचे सगळे येणार आणि शिवाय बरोबर चहा किंवा दुसरं काहीतरी आणून संगीताचा आनंद घेणार. पण तिकडे सामूहिकता इतकी कमी आहे की ते स्वतःला ख्रिश्चन कसे म्हणतात मला समजत नाही. चर्चमध्ये मात्र अगदी झकासपैकी कपडे करून जाणार. तिथल्या मेयरने सांगितले की पंधरा मिनिटं बरोबर बसणार. अगदी घड्याळ बघून आणि एका तासानंतर तुरूंगातून सुटल्यासारखे बाहेर पडणार. आणि तुमच्या बरोबर तासन्-तास् बसलेले हे लोक किती श्रीमंत. मला वाटते की मीच त्यांच्यावर जादू करत असेन. तिकडे लोक सामूहिकतेत फारसे येत नाहीत. दुसरं म्हणजे दारूची नशा असल्याशिवाय त्यांना एकमेकात संभाषण करणे जमत नाही. सदैव ते थकलेले. चित्रपटगृहात सिनेमा पहायला किंवा असच दुसरीकडे आले की लगेच बसतील इतका थकवा, तरूण माणसंसुद्धा आणि सतत विचार, विचार आणि विचार हे सर्व आज्ञेमुळे, सारखा ख्रिस्त विरोधी विचारांमुळे आणि तसल्याच कामामुळे आता काय करायचं, उद्या काय करायचे हेच विचार. आपण तरीही आशा करू या की या प्रकारचा धर्म नाहीसा होईल; असले सर्व धर्मच नष्ट होतील. आता फारच झाले आणि हा शेवट व्हायलाच हवा. त्यांचा काही आधार नाही आणि तुम्ही त्यांना सावरू शकत नाहीत. त्यांच्यामध्ये अधर्म इतका पसरलेला आहे की तुम्हाला ते सहन होणार नाही. इस्लाम, हिंदू,ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन इ. सर्व पंथाचा शेवट व्हायला हवा. ख्रिस्तांचा कुठला धर्म होता? तुमचा सहजयोग हा एकच धर्म आहे. विश्वाचाही तोच धर्म आहे. तो पवित्र आहे आणि जन्मतःच तो तुमच्यामध्ये आहे तुम्ही दुसऱ्या कुठल्या धर्माचे अनुयायी नाही कारण तसा कोणताच दुसरा धर्म नाही. म्हणून मला आशा आहे की सन २००० पर्यंत पृथ्वीवरचे सर्व धर्म लयास जातील कारण ते सर्वजण काही कारण नसताना एकमेकांशी भांडत आहेत, एकमेकांना फुकट ठार मारीत आहेत. त्यांना तेच आवडते. कुराणला का दोष द्यायचा, बायबलला का नावे ठेवायची? काळ कठीण आला असं का म्हणायचे? त्यांना आपल्या धर्माचा देशच पाहिजे. स्वतःची वेगळी जात पाळायची आहे; एकदा तुम्ही विभक्त होण्याची परिक्रिया सुरू केली की तुम्ही ख्रिस्त - विरोधी बनता. सहजयोगात तुम्हा सर्वांची एकच ओळख आहे; दुसरी कुठली कल्पनाच माझ्या डोक्यात नव्हती व नाही. आपण सर्वजण एकाच बापाचे पुत्र आहोत. एकाच आईची लेकरे आहोत. वेगवेगळे तट पाडण्याची आपल्याला कशाला जरूर? पण आतासुद्धा मी पहाते की निरनिराळे ग्रुप पटकन जमतात. उदा. महाराष्ट्रियन लोक एकत्र बसणार. भारतीयांची ती सवयच आहे, त्यांचा स्वभावच तसा आहे. उत्तर हिंदुस्थान्यांची पण तीच तऱ्हा. तुम्ही इंदोरला आलंच पाहिजे हे का? तो भारताचाच भाग आहे ना? त्यांना दिल्लीला येणं जमणार नाही; पण मीच सगळीकडे सगळ्या खेडयात जायला हवं! असं का? आज तुम्ही दिल्लीत जन्माला आला, उद्या आणखी कुठल्या भयानक गावी जन्माला आलात तर? तसंच या ठिकाणी माझे घर आहे ही अशीच एक डोकंदुखी तुम्ही माझ्य-माझ्या-माझ्या ठिकाणी यायला पाहिले. हे एकदा सुरू केलंत की मग तुमचं संपले. तुम्ही मग ख्रिस्तांचे कोणी लागत नाही. आज तुम्हाला अशी सवय झाली आहे की तुमच्या आजूबाजूला तुमचेच देशबांधव दिसायला हवे. तुम्ही नुसते शेजारी जे बसले आहेत त्यांच्याकडे पहा ते कोणी परके आहेत का? सहजयोगात 'दुसरा' असा कोणी आहे का? आपण सारे 'एक' आहोत आणि तुम्हाला माझ्याबद्दल व ख्रिस्तांबद्दल प्रेम असेल तर तुम्ही ही एकतेची भावना बाळगलीच पाहिजे. ग्रुप बनवण्याचे सर्व धंदे आता संपले पाहिजे. सहजयोगामध्ये आपण सर्व एक आहोत. एकच ओळख असणारे, एकच शरीर असलेले, एकाच संस्थेचे; आपण एकमेकांपासून वेगळे आहोत असं म्हणूच शकत

नाही. हा हात शरीरापेक्षा वेगळा आहे का? त्याला वेगळे अस्तित्व आहे का? एकदा का तुम्ही वेगळेपणाची भावना सोडून दिली म्हणजे किती आनंद मिळतो याचे तुम्हालाच आश्चर्य वाटू लागेल. पण जर तुम्ही मी-मी माझे यातच गुंतून राहिला तर मग सहजयोगातही आनंद मिळणार नाही; दुसऱ्याच्या सहवासाचाही तुम्ही आनंद मिळवू शकणार नाही. माझी बायको, माझं घर, माझी मुले इ. इ! ही जाग तुमच्यामधेच यायला हवी. मी काही फक्त एकच देशाची नाही. पुष्कळ मुले व मुली सांगतात की आम्हाला भारतीयांशीच लग्न करायचे आहे. आता एका ३५ वर्षाच्या भारतीय मुलीला मी भारतीयच नवरा कुठून आणणार? मग विधुरच मिळवार किंवा कुणाला भारतीय पद्धतीचाच विवाह हवा! काय म्हणणार याला? अशा लोकांचे लग्न जमवणे अशक्य आहे. हा, तुम्हाला थोडी निवड करावीशी वाटेल तर ठीक आहे. तसं करा पण जोपर्यंत माझा प्रश्न आहे तोपर्यंत मी तुमच्या लग्नाला मान्यता देणार नाही. तुम्हाला जिथे योग्य जोडीदार मिळेल त्याच्याशीच लग्न करायची तुमची तयारीत पाहिजे. पुष्कळ भारतीय मुलींनी भारतीय मुलांशी लग्न केले आहे पण त्यांना काय त्रास भोगावा लागला मी सांगू शकणार नाही.

सहजयोगात यापुढे ते होणार नाही. एका हिंदुस्थानीचे दुसऱ्या हिंदुस्थानाशी लग्न सहजयोगामध्ये अजून जमलेले नाही. ते शक्य नाही; परमेश्वराची तशी इच्छा नाही तुम्ही तुमच्या जातीमध्येच असा संबंध का नाही शोधून काढत? भारतामध्ये तर त्याला खूप महत्व दिले जाते. माझ्या मुलीचे लग्न जमवताना ते म्हणायचे नको, हा श्रीवास्तव नाही आणि जरी श्रीवास्तव असला तरी म्हणायचे तो तुमच्या सारखा श्रीवास्तव नाही. मी म्हटले फार झाले. आमच्या घरी माझ्याहून वयस्कर असे बरेच नातेवाईक होते. म्हणून मी स्पष्ट सांगितले की श्रीवास्तवर असो वा नसो, मी त्यांचे लग्न जमवणार वास. माझ्या पतीलाही ते पटले. माझ्या नातींच्या वेळीही हीच तऱ्हा. श्रीवास्तव मिळाला तर छानच. नाही मिळाला तर नाही. महाराष्ट्रातही हाच प्रकार; त्यांच्यातले ख्रिश्चन झालेल्यांचीही हीच तऱ्हा. तुमचा विश्वास बसणार नाही. आता तर त्यांच्यातले काही लोक स्वतःला "दलित-ख्रिश्चन" म्हणवतात. म्हणजे खालच्या जातीतले पण धर्मांतर केलेले म्हणजे ही आणखी एक नवीन जात. एकदा ख्रिश्चन झाल्यावर जात कुठली? सर्वच ख्रिश्चन; पण नाही; दलित ख्रिश्चन वेगळे, वरच्या वर्गातले ख्रिश्चन वेगळे; त्यांच्यामध्ये एकमेकात विवाह संबंध चालणार नाही. एरवी सर्व ख्रिश्चन, ख्रिस्तांचे अनुयायी, चांगले कपडे करून नियमित चर्चला जाणार. स्वतःजवळ नसला तरी इंग्रजांप्रमाणे हवाच म्हणून दुसऱ्याचा सूट उसना आणून चर्चला जायलाच पाहिजे. भारतातील ख्रिश्चन लोकांप्रमाणे ख्रिस्तांचा जन्म इंग्लंडमध्ये झाला. तुमचा विश्वास बसत नाही ना? पण सूट-टाय घातल्याशिवाय तुम्हाला चर्चमध्ये जाता येणार नाही. धोतर नेसून चर्चमध्ये जाणाऱ्या माणसाची तुम्ही कल्पना करू शकता का? शक्य नाही. मी ख्रिश्चनाबरोबर लग्न केले नाही ही देवाची कृपा. माझ्या बहिणींनाही विवाहाचे वेळी साडीच्याऐवजी झगा घालावा लागला. भारतीय स्त्री साडीशिवाय लग्नासाठी दुसरं काही वापरणे शक्य नाही पण त्यांना जबरदस्तीने फ्रॉक घालावा लागला. पुष्कळांना इंग्लिश पद्धतीनेच लग्न करणे भाग पडले. आता तर, मला आश्चर्य वाटते की जपानी महिलाही ऑस्ट्रेलियात आल्यावर इंग्लिश वधूसारखा पोशाख करतात कारण ते ख्रिश्चन झालेले असतात. याच्यावरून असे दिसते की त्यांच्या मताप्रमाणे ख्रिस्त इंग्लंडमध्ये जन्माला आला होता. खरं तर ख्रिश्चन लोकांनी पोशाखाबद्दल इतके काटेकोर असायची जरूर नाही. या सगळ्या मूर्खपणाच्या कल्पना तुमचा ड्रेस असाच हावा, जेवतांना काटा इकडे, चमचा तिकडे इ पाश्चात्त्य देशातून आल्या. ख्रिस्त काय काटा-चमचा घेऊन जेवत होते? त्यांचा जन्मच मुळी गोठ्यात झाला. या लोकांच्या ड्रेस-काटे-चमचे इ. चा बाऊ पाहून हे ख्रिश्चन आहेत का याच्यावर विश्वास ठेवणे जड जाते; वर तुमच्याकडे जेवायला आले तर आधी प्लेट उलटी करून कुठल्या कंपनीची आहे हे पाहतील! त्यालाच महत्व. ते स्वतःला ख्रिश्चन म्हणवतात हाच मुळी मूर्खपणा नव्हे काय? ख्रिस्तांनी तबेल्यात जन्म घेतला आणि या लोकांना या मूर्खपणाच्या गोष्टींबद्दल काटेकोरपणा! ख्रिस्तांच्या जन्मामध्येच काय महानता आहे हे तुम्ही समजून घेतले पाहिजे. गाई-वासरे बांधून ठेवली आहेत अशा

गोठ्यामध्ये ते जन्मले. तुम्हाला ख्रिश्चन माणूस ओळखायचा असेल तर रविवारच्या सकाळी त्याला पहा. माझ्या वडिलांचा याला फार विरोध होता, ते कुडता वापरायचे. ख्रिस्तांनीही कुडताच वापरला, सूट घातला नव्हता. भारतीय लोकांना आचाराची कृत्रिम सभ्यता वाळगण्याची वृत्ती मुळातच असते. त्यांच्याजवळ असती तर मे महिन्याच्या या गरम हवेत त्यांनी सूट का घालावा? आपण सहजयोगी आहोत. सामान्य माणसांसारखा सामान्य कपडे आपण वापरायला हवे. या परमचैतन्याशिवाय कुणावर तुम्हाला छाप पाडायची आहे? ते लोक वरवरचं बघतात. ड्रेससारख्या बाबतीत कमालीची शिस्त, राहण्याच्या सवयींबद्दल पण तेच. फार विचित्र प्रकार सगळा. मी हे सर्व पाहिलं आहे आणि म्हणूनच मी तुम्हाला बजावून ठेवत आहे. ख्रिस्त-विरोधी असलेल्या संस्कृतिपासून दूर रहा. प्रत्येक बाबतीत त्यांनी ख्रिस्तांचा उघड-उघड अपमान केला आहे. तुम्ही सुद्धा आपल्या रहन-सहनमधून ख्रिस्तांचा अपमान होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

ख्रिस्तांचा संदेश आहे की तुम्ही तुमच्यातील दैवी प्रवृत्ती सक्षम बनवा आणि चारित्र्य बलशाली बनवा ज्यायोगे सहजयोग उठून दिसेल ते तुमचे ज्येष्ठ बंधू आहेत. त्यांच्या जीवनाचे अनुकरण करा. त्यांना कशाचीही नोकरी, धंदा, घर कसली चिंता वा भीती नव्हती. सगळ्यांमध्ये ते निर्भय होते. त्यांच्या आयुष्यामध्ये त्याची खुप सुंदर उदाहरणे आहेत. पण आपण जेव्हा ख्रिश्चन लोक पाहतो आणि त्यांच्यामध्ये ख्रिस्तांचे कोणते गुण अविष्कार झाले आहेत हे पहायचा प्रयत्न करतो तेव्हा आपल्याला समजते. त्यांनी ख्रिस्तांची कोणतीही अनुज्ञा पाळली नाही; कसलेही अनुकरण केले नाही. आपण सहजयोगी म्हणून आपली वेगळी संस्कृति आहे. आपण नीतीमत्तेचा आदर ठेवतो. आपले व्यक्तीमत्त्व भारदस्त आहे. आपले एक वेगळेच व्यक्तीमत्त्व आहे. आपण निर्भय आहोत, आपण खोटे बोलत नाही व दुसऱ्यांना लुबाडत नाही. आणि आपल्याला कुणी भुरळ पाडू शकत नाही. आपली संस्कृती ''आईची संस्कृती'' असायला हवी. त्यामध्ये दिखाऊपणा किंवा कृत्रिमतेचा हव्यास नाही. तुम्ही एकदा ही ''आईची संस्कृती'' अंगी बाणवली की सारे जीवनच बदलेल. तुमचे विचार तुमच्या कल्पना बदलतील. मी तुमच्याकडे काही मागत नाही, या भेटवस्तूंचा स्वीकार करण्याची तुम्ही माझ्यावर जबरदस्ती करता, तुमच्या समाधानासाठी मी तेही मानते. पण एक गोष्ट अगदी निक्षून सांगते की यापुढं महाराष्ट्रीय महिलांनी माझी ओटी भरायची नाही. माझी ओटी अगदी काठोकाठ भरली आहे. कुणी म्हणजे कुणीही माझी ओटी भरायची नाही. कुणाचे लग्न झाले असेल कुणाला मुलगा-मुलगी झाली असेल तर त्यांची ओटी भरा. माझी ओटी नाही. वाटलं तर मंदिरात घेऊन जा म्हणजे तिची पुन्हा पुन्हा विक्री होईल आणि मधल्यामध्ये त्या पुजाऱ्यांचे पोट भरेल.

या ख्रिस्तपूजेच्या दिवशी एक गोष्ट सांगायची म्हणजे आपण ख्रिस्तांना काय दिले याचा विचार करा. तसेच दुसरी गोष्ट म्हणजे आपण माताजींना काय दिलं याचाही विचार करा. हे फार महत्वाचे आहे. मला तुमच्याकडून काहीही नको. अजिबात नको. मी स्वतःशी पूर्ण समाधानी आहे. मला एवढंच पाहिजे की तुम्ही सहजयोगाला, सत्य व प्रेमाला पूर्णपणे वाहून घ्या; ख्रिस्तांनी म्हटल्याप्रमाणे कुजबुजणारे जीव बनू का; इकडच्या - तिकडच्या गप्पा मारलेलं मला आवडत नाही ते चांगले नाही आणि ते बंद झाले पाहिजे. नाही तर तुम्ही खाली घसराल आणि तेसुद्धा अगदी भयंकर प्रकारे; ही आणीबाणीची (Last Judgement) वेळ आहे म्हणून तुम्ही स्वर्गाला तरी जाल नाही तर नरकाला. ही प्रक्रिया चालू झालीच आहे. म्हणून तुम्ही कुठे आहात ते पहा. मी तुमची आई म्हणून तुम्हाला सुधारण्यासाठी पुन्हा पुन्हा सांगते की ही आणीबाणी आहे हे विसरू नका; आणि म्हणून ख्रिस्तांच्या विरोधातले कार्य सोडून द्या. आपलं कुठे काय चुकत आहे ते तुम्हीच तुमच्या आतमध्ये शोधून काढा आणि त्याच्यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे सहजयोगाला समर्पित व्हा; त्याच्यातून पैसे मिळवायच्या मागे मात्र लागू नका, तसंच सहजयोगामध्ये राजकारण करू नका; सहजयोगाचा महान वृक्ष कसा बनेल ते बघा. तुमच्यामध्ये ती शक्ती आहे म्हणून ते घटित व्हायलाच पाहिजे व होणार आहे. म्हणूनच आज तुम्ही इथे आहात.

तुम्हा सर्वांना परमेश्वराचे अनंत आशीर्वाद.

✪

# नवरात्री पूजा

**प.पू. श्री माताजी निर्मलादेवींचे भाषण**

**कबेला : इटली : २० ऑक्टो ९६**

आजचा पूजेचा दिवस विशेष आहे कारण या पूजेच्या देवीने नऊ वेळा या पृथ्वीवर अवतरण केले आणि सर्व राक्षसांचा, विरोधी शक्तींचा संहार करून साधकांना यज्ञ करण्यासाठी संरक्षण दिले. तिचे हे सर्व महात्म्य पुराणात लिहून ठेवले आहे. तरीपण पुन्हा एकदा या राक्षसी शक्ती व विरोधी लोक प्रबळ झाले आहेत. तसे पाहिले तर या कलियुगामध्ये असे होणे साहजिकच आहे कारण असे राक्षस असल्याशिवाय कलियुगाचे हे नाटक पूर्ण होणार नाही. त्यांची दुष्कृत्ये चालू असली तरी आता हे एक वेगळया प्रकारचे युद्ध होणार आहे आणि शांतताप्रिय लोक यावेळेस लढणार आहेत; शांत वृत्तीचे लोक आयुष्यात सर्व काळी यशस्वी होतात. जरी जगात आजपर्यंत तसे झाले नसेल तरी आता ते घटित होणार आहे.

असे सांगतात की चेंगीझखान भारतावर स्वारी करून आला तेव्हा तो गंगातीरावरील एका मोठ्या बौद्ध-विहारमध्ये घुसला आणि त्या सर्व सर्व बुद्धांना त्याने ठार मारले. त्यावेळेस तिथे ३०,००० बुद्ध-भिक्षु होते पण त्यांनी चकार शब्द काढला नाही आणि ते सर्व मारले गेले. त्यामुळे बुद्ध धर्मावरचा लोकांचा विश्वास ढळू लागला; ते म्हणू लागले की हा कसला बौद्ध धर्म? भगवान बुद्धीने त्यांना का नाही वाचवले? ही मानवी विचाराची पद्धत आहे; पण तुम्हाला आश्चर्य वाटेल की त्या कलियुगामधेच चेंगीझखनाची अनेक लेखकांनी प्रशंसा केली आणि तसे ग्रंथ पण लिहिले. तो मुसलमान नव्हता; एक मूर्ख वेडा होता. त्याने बऱ्याच मशिदी पाडल्या. बऱ्याच प्रसिद्ध वास्तूंचा नायनाट केला; भारतावर स्वारी करून तिथे काही काळ राज्य केले; हा सर्व इतिहास आहे. ख्रिश्चन लोकांनी पण इतर धर्मीयांबरोबर लढाया केल्या; मुसलमानांनीही तेच केले; आणि अशा प्रकारच्या सर्व युद्धांमध्ये प्रामाणिक साधकांचेच नुकसान झाल्याचे आपल्याला दिसते; ज्यांनी परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा ठेऊन त्याची पूजा केली त्यांनाच शिक्षा भोगावी लागली. लोकांचा देवावरचा विश्वास उडून ते नास्तिक बनू लागले; ईश्वर वगैरे सर्व खोटे आहे, परमेश्वराची सत्ता वगैरे सर्व खोटे आहे आणि त्याला मानणे व त्याप्रमाणे वागणे हा सर्व मूर्खपणा आहे वगैरे विचार पसरत गेले. त्यातून आणखी परिणाम म्हणून नेते व धर्मकारणी लोक सांगू लागले की ते लोक पापी होते म्हणून मारले गेले; आणि त्या परिस्थितीचा त्यांनी स्वतःसाठी फायदा करून घेतला व वर कांगावा केला की ते लोक खरे भक्त नसल्यामुळे आम्ही त्यांना ठार केले आणि आम्ही विजयी झालो. आता हे कलियुग सुरू झाले आहे आणि या कलियुगामधेही तोच प्रकार चालला आहे पण एका वेगळयाच तऱ्हेने खोलातून विचार केला तर दिसेल की आताचे हे युद्ध ईश्वराला मानणारे आणि ईश्वराला न मानणारे यांच्यामधील आहे. हे दुसऱ्या प्रकारचे लोक अप्रामाणिक, ढोंगी व भ्रष्ट आहेत आणि स्वतःच्या स्वार्थासाठी देवाचे नाव घेत आहेत; ते क्रूर आहेत आणि अधिकार नसतानाही देवाच्या नावाचा झेंडा मिरवीत आहेत. पूर्वीच्या आणि आत्ताच्या लढाईतला हा फरक फार सूक्ष्म आहे. त्यामध्ये जे विजयी होतात त्यांना वाटू लागते की आपल्याला जे पाहिजे होते ते आपण मिळवले. पण या कलियुगामधे असं दिसून आले आहे की त्या इतिहासकालीन घटनांना आता निर्लज्जपणा समजू लागले आहेत, तो निव्वळ आक्रमकपणा किंवा मूर्खपणा होता असे म्हणू लागले आहेत. सगळीकडे हाच प्रकार दिसतो. उदा. पहा की गोरे लोक

अमेरिकेत गेले आणि तिथल्या आदिवासींचा त्यांनी पूर्णपणे नायनाट केला. पण आता ते सर्व उघडकीला येत आहे त्यावेळेस विजय मिळवला असे ज्यांना वाटले त्यांचीच मुले नातवंडे व वंशज आता त्यांना नावे ठेवीत आहेत व त्यांच्याच वंशजांना त्यांची लाज वाटू लागली आहे.

दुसऱ्या महायुद्धापर्यंतच्या काळात ही जाणीव निर्माण होणे हाच प्रचलित काळाचा कलियुगाचा विजय आहे. ज्या ज्या (अयोग्य) गोष्टींना राजकारणाचा भाग म्हणून प्रतिष्ठा दिली गेली त्या सर्व घटनांना सध्याच्या युगात आव्हान दिले गेले आहे. जिथे जिथे आक्रमण झाले, जिथे जिथे अन्याय झाला, जिथे जिथे क्रूरपणा माजला त्या सर्वांबद्दल आता शिक्षा मिळणार आहे. युद्धांमधील काही अपराधी सुटले असतील पण बऱ्याच जणांवर आता न्यायालयीन खटले चालले आहेत. पूर्वी असे काही घडले नव्हते. चेंगीझखनावर कसली कारवाई झाली नाही. पण आता असं काही सूक्ष्मपणे घडून येत आहे की सगळ्या अहंकारी लोकांना आपण उघडकीस येऊन आपल्याला कठोर शिक्षा मिळणार अशी भीती वाटू लागली आहे. इटलीमध्ये मुसोलिनीने खूप अनाचार माजवला पण शेवटी त्याला फासावर जावे लागले. जर्मनीमध्ये हिटलर हा एकेकाळी महाशक्तीमान होता पण आता जर्मन लोकांना त्यांचे नाव काढलेले पण आवडत नाही. त्याची त्यांना घृणा वाटते. इंग्लंडहून वॉरेन हेस्टिंग्ज हिंदुस्थानमध्ये राज्य करून गेल्यावर त्याच्यावर खटला भरला गेला. नेपोलियनने पुष्कळ प्रदेशांवर आक्रमण केले आणि त्याला वाटले की आपण विजयी झालो पण त्यालाही त्याचे परिणाम भोगावे लागले. ज्या ज्या लोकांनी आक्रमकता गाजवली, अधिकार गाजवला, क्रूरपणाची वागणूक दिली त्या सर्वांना बहुतेक जिवंतपणीच त्याचा जबाब द्यावा लागला. हयात असेपर्यंत नाही तरी मरणानंतर त्यांची निर्भत्सना झाली. त्यांचे पुतळे लोकांनी कधीच उभारले नाहीत. ही जाण लोकांमध्ये जागृत झाली. स्टॅलिनने रशियामध्ये सत्ता चालवली पण तिथे त्याचे पुतळे कुठेच नजरेस येत नाहीत.

आजकाल जगामध्ये शक्ती कशी कार्यान्वित झाली आहे हे लक्षात घ्या त्यामुळे ज्यांना आपण काय वाटेल ते केले तरी आपण सहीसलामत राहू असे वाटत होते ते लोक घाबरून गेले आहेत. लवकरच त्यांच्या लक्षात येईल की हा मूर्खपणा आपण थांबवला नाही तर आपली धडगत नाही. ज्यांच्यावर अन्याय केला जातो ते नव्हे तर जे असा अन्याय करून हुकूमत गाजवतात त्यांना शारीरिक, मानसिक असे खूप त्रास होणार आहेत आणि त्यांचा नावलौकिक रसातळाला जाणार आहे. आदिमातेच्या विजयाची ही शक्ती सध्या एक महान कार्य करीत आहे आणि ते म्हणजे अशा राक्षसी कार्य करणाऱ्या दुष्ट प्रवृत्तींना उघडे करणे आणि त्या लोकांचा सर्वांसमक्ष धिक्कार करणे. या दृष्टीने तुम्ही विचार केलात तर आपण आता विजयी झालो आहोत हे तुम्हाला नीट समजेल.

सहजयोगी म्हणून तुम्हाला पूर्वीच्या काळातील जाणीव आणि सध्याच्या काळातील उन्नत जाणीव यामधील फरक लक्षात घ्यायला पाहिजे. त्याकाळी दानवांचा संहार करणे जरूरीचे होते पण आता तेच राक्षस, पुन्हा नव्याने कार्याला लागले आहेत तर सध्याच्या या कलियुगामध्ये त्यांची दुष्कृत्ये उघडकीला येत आहेत, त्यांना झिडकारले जात आहे. त्यांना तुरूंगवासाची शिक्षा मिळत आहे. ज्यांनी ज्यांनी असे घोर अन्याय, अनाचार केले पण कसलीही शिक्षा न होता, बदलौकिक न होता ते मरण पावले त्या सर्वांवर ही सामूहिक चेतना विजय संपादन करणार आहे.

आता आपण चेतना आणि जाणीव यातील फरक बघू या तुम्हाला जेव्हा कुठल्या वस्तूची जाणीव करून दिली जाते तेव्हा त्याबद्दल तुमची जाणीव तुमच्या लक्षात येते. आता पहा की मला हे हात आहेत याची माहिती असूनही हे माझे हात आहेत याचे मला भान नसते. एखादा माणूस झोपलेला असतो तेव्हा मी झोपलो आहे हे भान त्याला नसते. तुमही मला जेव्हा सांगता की मला हात आहेत किंवा माझ्या हाताला काही बोचले तरच मला हात आहेत ही जाणीव माझ्यामध्ये निर्माण होते. तसेच आपल्या डोळ्यांबद्दल आपल्याला मुळीच जाणीव नसते; पण समजा आपण आंधळे झालो आणि काही दिसेनासे झाले की मग आपल्या लक्षात येते की आपल्याला डोळे आहेत पण आपण त्यांच्यामधून काही पाहू शकत नाही तसे तुम्ही एकदम म्हणाल की हा माझा हात आहे; असं पण म्हणता येईल की तुम्हाला तुमच्या हाताचे ज्ञान झाले. पण एकदा ही जाणीव गेली की ते ज्ञानही अंतर्धान पावते. म्हणून ज्ञान

असणे आणि अज्ञान असणे दोन्ही एकप्रकारे सारखेच. तुम्हाला हाताची जाणीव नसल्यामुळे तुम्हाला त्याचे ज्ञान नव्हते. पण आता असं बघा, कुणी मला म्हणाले की वा, तुमचे हात किती सुंदर आहेत तर तावडतोब माझे हात सुंदर आहेत ही जाणीव मला होईल; पण एरवी माझे त्यांच्याकडे लक्ष जाणार नाही. साधारणपणे माणसांची स्थिती अशी असते आणि त्यावेळी कुणीतरी तुम्हाला सांगावे लागते. तसेच मला कुणी म्हणाले की तुमची साडी किती छान आहे तर मग मी माझ्या साडीकडे बघेन आणि म्हणेन की खरंच ही छान साडी आहे, मला कधीच लक्षात आले नाही. म्हणजे जाणीव निर्माण व्हायला कुणीतरी तुम्हाला सांगायला हवे. एरवी ती जाणीव नसते. सर्वसाधारण माणसांची स्थिती अशी असते.

आता जागृतावस्था कशी असते ते पाहू. ती एक वेगळीच स्थिती आहे. माझ्यावर जर कुणी मारायला धावून आला तर मीच माझे हात उचलून असे पुढे धरते. म्हणजे मी माझ्या हातांबद्दल जागृत आहे; मला हातांची जरी जाणीव नसली तरी मला हात आहेत आणि त्याचा वेळ पडली की उपयोग करते हे भान माझ्यात कायम असते. आता या इटलीमध्ये तुम्हा लोकांना सारखे हात हलवण्याची सवय आहे, याचाच अर्थ तुम्हाला आपल्या हातांचे भान आहे आणि काही विशेष मुद्दा जोरदारपणे मांडण्यासाठी त्याचा उपयोग केला पाहिजे हे भानही आहे. म्हणजेच आपल्याला आल्या देहाचे भान आहे. इतरांचे भान आहे. इतरांची आपल्याला माहिती आहे. समोरचा माणूस कसा आहे हे पण माहीत आहे. पण आत्मसाक्षात्कारानंतर विशेष फरक हा घडून येतो तो हा की तुम्ही जाणीव व जागृत भानावस्थेच्या, दोन्हींच्या पलीकडे जाता. कारण तुम्ही निर्विचारी अवस्थेत येता. (विचारांच्या पलीकडे जाता). म्हणजे काय तर राग, कल्पना हेसर्व तुमच्या मनाचेच खेळ असतात. जर हे मनच नाहीसे झाले तर तुमचे काय होईल? मन नाही म्हणजे तुम्ही पूर्ण अवस्थेमध्ये येता. मनातून होणारे सर्व संपर्क संपून गेलेले असतात. एका मनावर तुम्ही विजय मिळवला की साऱ्या शत्रूंचा पाडाव केल्यासारखे होते मनाकडून येणाऱ्या सूचना संपतात, तुम्हाला सूचना देणारे मन नाहीसे झाल्यामुळे तुम्ही स्वतःला हरवून बसता.

असं म्हणतात की तुम्ही स्वतःलाच प्रश्न विचारा की "मी कोण आहे?" हा प्रश्न विचारल्याबरोबर तुम्ही निर्विचार होता; स्वतःला विसरून जाता. याचे उत्तर तुम्हाला मिळणार नाही. नाही तर एरवी तुम्ही म्हणता की मी स्त्री आहे, मी अमुक आहे तमुक आहे. मी बिशप आहे, पोप आहे वगैरे वगैरे. पण एकदा आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर तुम्ही कोण आहात हे सांगणारा कोण राहतो? कारण तसं सांगणारे तुमचे मनच शिल्लक उरलेले नसते. विचार नाही म्हणजे तुम्ही स्वतःमध्येच विरघळून जाता. हेच सत्य आहे. पण तुम्ही जागृत असता हे पण लक्षांत घ्या. तुम्ही स्वतःलाच प्रश्न केलात तर तुम्ही नसता पण तरीही जागृत राहता. नाभीवर पकड आली की लगेच तुम्हाला लक्षात येते, अरे माझी नाभी पकडली आहे. तिला ठीक करू या. उपचाराकरता काही प्रश्न विचारण्याची गरज नाही, शेजारी कुणी जवळ असला तर लगेच डावे स्वाधिष्ठान समजेल. कुणी शीघ्र कोपी व्यक्ती जवळ आली तर लगेच गरम लहरी जाणवतील. इतक्या की --- पळून दूर जावेसे वाटेल.

तुम्हाला आजपर्यंत ज्याच्याबद्दल काहीच कल्पना नव्हती त्या सत्याची जाणीव तुम्हाला झाली आहे आणि तुम्ही आता नवीन जीवनाला सुरुवात केली आहे. आता समजा एखादा खुनी, चोर किंवा अशीच कुणीतरी व्यक्ति तुमच्यासमोर आली तर तुम्ही आत्मसाक्षात्कारी झाल्यामुळे तुम्हाला सर्व काही स्वच्छ दिसेल ज्याची तुम्हाला आधी काहीच कल्पना वा जाणीव नव्हती. तुम्ही सामूहिकतेत आला आहात आणि हेच सत्य आहे. सामूहिकतेत तुमची जाणीव व्यापक होते आणि साऱ्या जगाचे प्रश्न तुम्हाला समजतात. हे भान होणे एक वेगळीच प्रक्रिया आहे. आधी तुम्हाला कोणी सांगितले की तुम्ही असे आहात, तसे आहात तरच तुम्हाला त्याची जाणीव व्हायची. पण आता तुम्हाला तसं कोणी सांगण्याची जरूर नाही. ते सर्व आपोआप होत राहते. तुम्हाला सर्व काही स्वच्छ समजते. सध्याच्या बिकट काळी तुम्ही ही मोठी गोष्ट मिळवली आहे. आपण कोण आहोत हे तुम्हाला कळणे हेच सध्याच्या काळाचे दान आहे. आपण नेहमी म्हणत आलो की आत्मा हेच आपलं खरं रूप आहे पण कशामुळे तुमचा त्याच्यावर विश्वास बसणार? तुम्ही त्याला कधी पाहिले आहे का? तुम्ही स्वतः कसे आहात हेच अजून नीट पाहिलेलं नाही;

मग मी आत्मा आहे हे तरी कसं म्हणूं शकता? केवळ मी म्हणते म्हणून तुम्ही तसं म्हणत आहात. शुद्ध आत्माच फक्त परमेश्वरी शक्ती जाणू शकतो है जे आत्म्याचे वर्णन आहे तसेच तुम्ही झाला आहात म्हणून तुम्ही शुद्ध आत्मा आहात, शुद्ध आत्मस्वरूप तुम्ही मानली जन्मांत जाणल्यामुळेच तुम्हांला सर्वव्यापी परमेश्वरी शक्तीची जाणीव आली आहे. सर्व शास्त्रामध्ये, पौराणिक ग्रंथामध्ये हेच सांगितले आहे. तुम्ही तुमची चक्रे समजू शकता म्हणून तुम्ही आत्मा आहात आणि तेच तुमचं स्वरूप आहे. आपल्या नाड्यांचीपण तुम्हाला ओळख झाली आहे. म्हणजे काय झालं आहे तर तुम्ही आता वेगळेपणाने, साक्षीपणाने स्वतःकडे पाहू शकता. स्वतःला तुम्ही स्वच्छपणे पाहू शकता आणि स्वतःचे भूत-भविष्य-वर्तमान स्वच्छपणे पाहू शकता. आपण भूतकाळी काय होतो त्याचा आता धक्काच बसतो, बाप रे, आपण काय -काय भोगले! हे सर्व आत्ताच्या वर्तमानात तुम्हाला कळते. मग तुम्ही भूतकाळ विसरायला लागता. पण भविष्यकाळ अजून उरलेला असतो. मग तुम्ही भविष्याचा विचार करू लागता, प्रथम मुलं-बाळं, पत्नी, आपल्या नंतर पत्नीचे, मुला-बाळांचे कसे होणार इ. इ. मग त्यांना सहयोगाचे पुढे काय होणार? आणखी नंतर माताजींचे काय होणार? त्याच्याही पुढे मग या जगाचे काय होणार? हे सर्व तुमची भान-स्थिती खूप व्यापक झाल्यामुळे होते, कारण तुम्ही तुमच्या सीमित परिघातून बाहेर आलेले असता; तुम्ही मुलबाळांचा, पत्नीचा, साऱ्या जगाचा विचार करू शकता. अशा तऱ्हेने तुम्ही उच्च स्थिती प्राप्त करता. आता यामागे तुमची कोणती श्रद्धा असते की ज्याच्यामुळे तुमच्या मुलांचे, कुटुंबाचे, पत्नीचे सर्व प्रश्न सुटतात? आपल्याजवळ शस्त्र नाही, युद्ध करायला आयुधे नाहीत, कित्येक जणांना तर तलवार कशी धरायची हे पण माहीत नसते, शिवाय पुष्कळांना तलवारच नकोशी वाटते कारण ते करुणेच्या सागरात रमलेले असतात आणि त्याच्या आनंदात मस्त असतात. स्वतःमधील करुणा, इतरांच्यामधील करुणा, श्री माताजींची करुणा या सर्वांचा आनंद लुटत असतात. पण हे प्रश्न कसे सुटणार? तुम्ही जर स्वतः आतून शक्तीशाली झालात तर हे प्रश्न सुटणारच. तुम्ही आतमध्ये उतरायला पाहिजे. माझं काम झाले आहे. मी तुम्हाला आत्मसाक्षात्कार दिला आहे, तुमची आजपर्यंत चांगली प्रगती झाली आहे. मी तुम्हाला सारे काही सांगितले आहे व समजावले आहे. यावेळेस तर मी तुम्हाला प्रेम-सागरात आणले आहे. पण आता तुमची तुम्हालाच काळजी घ्यायची आहे. स्वतःला आतमधून शक्तीशाली बनवायचे आहे. तर आता हे तुम्ही कसे मिळवणार?

सर्वप्रथम तुम्ही हे पक्के लक्षांत घ्या की तुम्ही आता सामान्य मानव राहीला नाही तर एका उन्नत मानवी स्थितीला आला आहात. ही श्रद्धा काही अंधश्रद्धा नाही किंवा आंधळा विश्वास नाही. मी अनेकवेळा तुम्हाला सांगितलेच आहे की तुमच्या उत्क्रांतीवर आणि सहजयोगी झाल्याबद्दल तुम्हाला पूर्ण अभिमान व आदरयुक्त विश्वास असला पाहिजे. त्यासाठी ध्यान करणे फार आवश्यक आहे. ध्यानाशिवाय तुम्ही स्वतःला खऱ्या अर्थाने जाणू शकत नाही आणि म्हणून तुमचा स्वतःवर पूर्ण विश्वास बसणे शक्य नाही. "मी कोण आहे" असं स्वतःलाच विचारून पाहीले तर तुम्ही स्वतःलाच विसरून जाल. तर मग तुमचा विश्वास असा पाहिजे की आपण एक अशी स्थिती प्राप्त करून घेतली आहे जिथे मला सांगायला पाहिजे की हा विश्वास काही मनाची कल्पना, भावनिक किंवा शारीरिक गोष्ट नसून ती तुमची मूळ स्थिती आहे. ज्याला आपण अध्यात्मिक अवस्था असे संबोधतो. अध्यात्मिक स्थितीमध्ये कुठल्याही गोष्टीने तुमची स्थिती बिघडत नाही. तुमच्यावर कुणीही अधिकार गाजवणार नाही, कुठल्याही शक्तीपुढे तुम्ही वाकणार नाही. कारण त्या स्थितीवर आल्यानंतर तुम्ही परम-सत्य वस्तूचा अंश बनता. परमेश्वराच्या साम्राज्यांत मानाचे स्थान मिळवता. तुमचे व्यक्तिमत्व आदरणीय होते. तुम्ही गणासारखे होता, त्या स्थितीमध्ये जी साधारण माणसाच्या स्थितीच्या पलीकडे असते, तुम्ही फार बलशाही होता.

निझामुद्दिन या महान संताची एक गोष्ट आहे. एक भयंकर राजा होता पण हा निजामुद्दीन त्याच्याकडे जाऊन सलाम करत नसे. तो म्हणायचा की मी देवा व्यतिरिक्त दुसऱ्या कुणापुढेही वाकणार नाही. राजाने सांगितले "जर उद्या माझ्यासमोर येऊन तू सलाम केला नाहीस तर तुझी मान कापली जाईल" आणि त्याच रात्री राजाचीच मान कापली

गेली. हे निजामुद्दीनने केले नाही, तसं तो करणारच नाही. त्या स्थितीला डोळस श्रद्धा असं आम्ही म्हणतो. ही एक नवीन घटना आहे. ज्यामध्ये तुम्ही 'पूर्ण'चे अंश बनून जाता.मी कधी सूर्याला आजच्या पूजेला या असं म्हटले नाही. आधीही कधी म्हटले नव्हते, पण यावेळेस लोक म्हणाले की तसं सांगायाची जरूरही नाही कारण सर्व अगोदरच योजना झालीआहे. चैतन्यलहरींना पण मी क्रॉस दाखवा किंवा हे चमत्कार वाटतील असे फोटो तयार करा. असे म्हणत नाही. त्या लहरीच आपणहून ते जमवून आणतात. मलाच कधी कधी आश्चर्य वाटते की त्याच्यामध्ये हे सारं घडवून आणण्याची उपजत शक्ती कशी आली. पण हे सर्व आपोआप घडून येते, माझ्याजवळ एकच गोष्ट आहे म्हणजे त्यांच्यावरचा पूर्ण विश्वास; आणि मी त्यास्थितीला आहे म्हणून पूर्णपणे संयमी व शांत आहे आणि हेच तुम्हाला शिकायचे आहे. आपण सर्व त्या स्थितीला आल्यामुळे हे सर्व घटित होणारच आहे. सर्व काही घटित होते. आपण मात्र ध्यान करणे फार फार महत्त्वाचे आहे.

आता आपल्याकडे माताजी **(Mother)** हनुमान, गणेश, ख्रिस्त इ. मूर्ति कशा करता आहेत? कारण सुरुवातीला मानवाला सगुणाशिवाय काही समजणे शक्य नसते. मूर्ति (आकार) असल्याशिवाय त्याला गहनतेत उतरणे जमत नाही. मग ते दुसऱ्या टोकाला गेले दगडासारख्या गोष्टींना देव मानू लागले. पण आता तुमच्यातील विवेक जागृत झाला आहे आणि तुम्हाला कशाची पूजा करायची, कुणाला उच्च व्यक्ति मानायची हे तुम्हाला समजते. पण त्याआधी लोक कुणाचीही पूजा करायचे. आता लोक पोपची पूजा करतात, म्हणजे ते नुसतेच आंधळे किंवा अज्ञानी आहेत एवढंच नव्हे तर त्यांना त्याची जाणीवसुद्धा नाही. ते सर्व अशा स्थितीमध्ये असल्यामुळे त्यांना काही सांगणेही अवघड आहे. पण तुम्ही वेगळे लोक आहात आणि तुम्ही त्यातून बाहेर पडण्याकरता आणि परम-सत्य जाणण्याकरीता झगडलात, कष्ट केले व धडपडलात. जोपर्यंत तुम्ही परम-सत्य जाणले नाही तोपर्यंत तुम्ही सूज्ञ झाला नाही. पण एकदा परम-सत्य जाणल्यावर चुकूनसुद्धा अर्धे इकडचे व अर्धे तिकडचे असे राहू नका; ती फार धोकादायक स्थिती असते. असं पहा की बीला एकदा अंकूर फुटला की ती बी पण नाही आणि वृक्ष पण नाही अशी होते; तिची वाढ झाली नाही तर सर्व बेकार. तुमच्या ज्ञानाची तशी अवस्था होईल. सहजयोगामध्ये शांतता मिळवण्यासाठी खूप लोक येतात पण मला पत्र येतात की माझे वडील आजारी आहेत, आई आजारी आहे. भाऊ आजारी आहे, माझा नवरा माझ्याशी फार भांडतो. मला घटस्फोट हवा आहे इ. किंवा माझे सारे पैसे चोरीला गेले, मला पैसे पाहिजेत, किंवा मी फार मोठा कलाकर आहे पण माझी कला कुणी विकत घेत नाही... तर मी म्हणते हे कसले सहजयोगी?

सद्वस्तुबरोबर एक होण्याची ही स्थिती म्हणजे पूर्ण सत्य जाणणे. एकदा ही स्थिती पूर्णपणे प्राप्त झाली, एकदा त्याचा थोडासा अनुभव जरी आला तरी तुम्ही अंतर्यामी पूर्ण शांत होता. मग तुम्ही म्हणालात मी राजा आहे तर मी राजाच आहे; मी भिकारी आहे तर भिकारीच आहे. ही स्थिती शुद्ध बावनकशी सोन्यासारखी असते. त्याला कशाचाही धक्का लागत नाही आणि ही स्थिती तुम्हाला मिळवायची आहे. हे आपल्यापुढे एक आव्हानच आहे. आपण सहजयोगी झालो, आत्मसाक्षात्कार मिळाला. संगीत शिकलो. चांगली नोकरी मिळाली, छानपैकी लग्न झाले, सर्व काही मिळाले हे सर्व ठीक आहे. पण एखादी विरोधी शक्ती **(negativity)** आली की परत त्रास सुरु! त्यात घाबरायचे काय? तसं नाही झाले तर तुम्हाला स्वतःची स्थिती, स्वरूप कसं कळणार? अंधारच नाहीसा झाला तर प्रकाश तुमच्यामध्येच आहे हे तुम्हाला कसं समजणार? तुम्ही प्राप्त करून घेतलेल्या स्थितीपुढे हे आव्हान आहे. तुमच्या स्थितीची तुम्हाला जाणीव त्यातून होते. त्यालाच 'स्वरूप' म्हणतात. ही स्थिती 'नेति-नेति' म्हणत राहीलात तर तुम्ही सगळेजण मिळवू शकाल. तुम्ही मनाच्या पलीकडे पोचला आहात. तुम्हाला ते शक्य आहे आणि त्यासाठी तुम्ही आपले व्यक्तिमत्व तुम्हाला तुमचे खरे स्वरूप कळेल असे बनवले पाहिजे. त्या साक्षात्कारी स्थितीमध्ये तुमची जाणीव स्तब्ध असते पण तरीही तुम्ही जागरूक असता. उदा. मी तुम्हाला सांगते की मी अदिशक्ती आहे त्यावेळी मला ते भान असते आणि ते मला माहीतही असते. पण तुम्ही जेव्हा जय श्री माताजी म्हणता तेव्हा मी पण जय श्री माताजी म्हणते कारण

त्यावेळेस तुम्ही माझ्याबद्दल बोलत आहात याचा मला विसर पडलेला असतो. ही स्थिती आपण मिळवायची आहे.

आता तुम्ही मला इथे बसवता. मला भेट-वस्तू देता, ठीक आहे; ही तुमची कल्पना आहे पण मी स्वतःच परिपूर्ण असल्यामुळे मी स्वतःमधेच विरघळून गेली आहे; तुम्ही अमकं करा किंवा तमकं करा दोन्ही ठीक आहे किंवा काही करू नका तरीपण ठीक आहे. कारण त्यामध्ये तुम्हाला फरक वाटत असेल पण मला त्यामुळे काहीच फरक होत नाही. उदा. मला तुम्ही भेट-वस्तू देऊ नका असं म्हणते तर तुम्ही म्हणता, माताजी आम्ही वर्षातून एकदाच तुम्हाला भेट-वस्तू देतो मग तुम्ही त्याला नको का म्हणता, आणि त्यापासून आम्हालाच आनंद मिळत असतो. तसं असेल, तुम्हाला त्यात आनंद मिळत असेल तर तसं करा. पण मला त्यातून काही फरक वाटत नाही. कारण मी या ठिकाणी आहे असं मलाच वाटत नाही; मला तुम्ही सारे साक्षात्कारी संत इथे बसलेले दिसता. पण मी तुमच्यामध्येच आहे. मी वेगळी कुणी विशेष आहे. असं मला वाटत नाही; पण तुम्ही विचारले तर मी म्हणेन कीमी आदिशक्ती आहे. पण आदिशक्तीसुद्धा कुणी विशेष आहे. असंही मला वाटत नाही. जरा कुणी काही विशेष असला तरी त्यात काय मोठेपणा आहे? आता सूर्य हा कोणी विशेष समजला तरी त्याने काय फरक पडणार आहे? सूर्य सूर्यच राहणार. तसेच कुणी आदिशक्ती असेल तर ती आदिशक्ती असेल. पुढे काय? पण तुमचं तसं नाही; तुम्ही जन्मतः साक्षात्कारी नव्हता. तुम्हाला आता साक्षात्कार मिळाला आहे म्हणून तुम्ही आता विशेष झाला आहात. तुम्ही महान झाला आहात, तुम्ही काही विशेष अशी मोठी गोष्ट मिळवली आहे. मी तसं काहीच मिळवले नाही. मी अशीच होते आणि अशीच राहणार आहे; मी राक्षसांशी युद्ध केले काय किंवा तुमच्यासमोर अशी बसले काय दोन्ही एकसारखेच. पण माझ्या दृष्टीने तुम्ही महान आहात कारण तुम्ही ही महान गोष्ट मिळवली आहे. या नवरात्री पूजेच्या वेळी इतके सारे जण पूजा करण्यासाठी जमले आहेत हे कौतुकास्पद आहे. ही माझी मिळकत नाही तर तुमच्या साधनांची-सफलता आहे. मी या पृथ्वीवर पूर्वीपासून अनेकदा अवतरण घेतले आहे पण आजच्यासारखे कधी पहायला मिळाले नव्हते. पुष्कळजण तसे आले. सुळावर चढले, मृत्यू पावले पण आजच्यासारखे लोक मला कधी मिळाले नाहीत.

म्हणून मी परत एकदा हेच सांगते की तुम्ही आता कोण आहात हे नीट लक्षांत घ्या आणि स्वतःवर पूर्ण श्रद्धा बाळगा. तुम्हाला स्वतःबद्दल श्रद्धा असेल तर तुमची माझ्यावरही तशीच श्रद्धा राहील कारण तुम्ही माझ्यापासून निराळे नाही. तुम्ही हे पाणी आहे असं मानता तर जगभर कुठेही असले तरी ते पाणीच असणार आणि तुम्ही त्याला पाणीच म्हणणार. तुम्ही आपण सहजयोगी आहोत असं स्वतःला सहजयोगी म्हणून ओळखले की कुठेही सहजयोगी असला की तुम्ही लगेच ओळखाल की हा सहजयोगी आहे.

तुम्ही स्वतःला नीट ओळखा, सामान्य माणसासारखे वागू नका. तुम्ही आता वरच्या पातळीवर आला आहात. तुमची खूप प्रगती झाली आहे. आता त्याला फळ आलेली पहा. तुमच्यासाठी काय करावं मला खरंच कळत नाही. स्वतःबद्दल श्रद्धा बाळगा. या परमचैतन्यावर तुमची किती श्रद्धा आहे हे तुमचे तुम्हालाच कळून येईल. कारण तुमच्याबरोबर ते क्षणा-क्षणाला, पावलोपावली आहे. कसली भीती, काळजी नाही. काही मिळवल्याचे भान नाही, आता सर्व झाले. पूर्वी पाचच सहजयोगी होते तरी मी समाधानी होते आणि आता इतके दिसतात तरी पण मला समाधान आहे, कारण मी इतके सहजयोगी पाहते की मला वाटते की "सत्या"बरोबर एकरूप झालेली ही शक्तीशाली माणसे आहेत. ही सामूहिक एकरूपता पूर्वी कधी नव्हती म्हणून आजच्या दिवशी आपण काय करायचे असे विचाराल तर मी म्हणेन की आपण फक्त आपल्यामधील सैतानांना जाणले पाहिजे. तुम्हाला खरंच जर माझी पूजा करायची असेल तर तुम्ही तुमच्यामध्ये किती सैतान आहेत याचाच विचार करा आणि पहा. बस. बाहेरच्या राक्षसांची काळजी करू नका. ते तुमचे काहीच बिघडवू शकत नाहीत.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद.

✪

# सामान्यांना असामान्यत्व देणारा सहज योग

सहजे ब्रह्मरसाचे पारणे । केले अर्जुनालागी नारायणे ।
की तेचि अवसरी पाहुणे । पातलो आम्ही ।।

श्री ज्ञानेश्वरांच्या वरील उक्तिचा प्रत्यक्ष अनुभव यावा असाच प्रसंग होता. ब्रह्मरसाचा महापूरच अवतरला असेल अशा प्रसंगी प्रस्तुत लेखकासारखे कित्येक लोक आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रम होता. परम पूज्य श्रीमाताजी निर्मला देवी यांच्या वाढदिवसाचा आनंद सोहळा, तारीख होती २१ मार्च १९९५ स्थान होते नवी दिल्ली येथील निजामुद्दीन विभागातील स्काऊट ग्राऊंडवर घातलेला विस्तीर्ण व सुशोभीत मंडप परम पूज्य श्रीमाताजी निर्मला देवी यांचे खेरीज प्रमुख पाहुणे म्हणून श्री. टी. एन. शेषन उपस्थित होते. आपल्या भाषणात श्री. शेषन यांनी इच्छा व्यक्त केली की येथून पुढे येणाऱ्या भविष्य काळात हा देश निरंतर असा व्हावा की येथे सत्य, ईश्वर निष्ठा, न्याय, इत्यादि सद्‌गुण सतत नांदतील व चारही दिशांना या सद्‌गुणांचा प्रसार या देशातून होईल. सर्व जग ''वसुधैव कुटूंबकम्'' होईल.

श्री. टी. एन. शेषन यांनी जी इच्छा व्यक्त केली, तीच प्रार्थना युगानुगे या देशात जन्मलेल्या अवतारी व्यक्ति, ऋषि-मुनि, संत जनांनीही केली, जसे श्री. ज्ञानेश्वरांचे पसायदान, याच प्रार्थनांना मूर्त स्वरूप यावे यासाठी, सर्व सामान्य माणसाला असामान्यत्त्वा प्रत उत्क्रांत होण्याचा सोपा मार्ग, सहज योग परम पूज्य श्री माताजी निर्मला देवी यांनी उपलब्ध करून दिला आहे. आधुनिक काळात सहज योगाचे अनन्य साधारण महत्त्व आहे. कारण सहज योगाची साधना करण्यामुळे मानवाला भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांवर उपाय योजना होऊ शकते. भौतिकता व उपभोग वादाचा वाढता प्रभाव व इच्छा पूर्तिची शक्यता यांच्यातील तफावत इच्छा पूर्तिसाठी करावे लागणारे परिश्रम, त्यातून उद्‌भवणारे मानसिक तणाव, अशा प्रकारचा आधुनिक काळातील मानवी जीवन क्रम आहे. मानसिक तणाव घालविण्यास मद्यपान, करमणूकींचे कार्यक्रम अथवा आपापल्या श्रद्धेनुसार केलेल्या अध्यात्मिक साधना, अशा गोष्टींचा आश्रय घेतला जातो. नितिमूल्याची चाड नसणारे, वेलगामपणे, सत्ता व संपत्तीच्या संपादनामागे लागतात. त्यांच्या विलासी वागण्याचे सर्वसामान्य लोक अधिकच अस्वस्थ होतात.

भौतिक सुखांची साधने शाश्वत, आनंदाचा लाभ देऊ शकत नाहीत. एवढेच नव्हे तर त्यांच्या गरजा सतत वाढणाऱ्या आहेत, हे आपल्या संस्कृतीने आपल्याला शिकविले आहे. परंतु अमर्याद जाहिरात - बाजीमुळे त्यांचे आकर्षण सतत वाढते तसेच प्रसार माध्यमातून पाश्चात्य संस्कृतीचे गुणगान सारखे होत असल्याने त्यांच्या अंधानुकरणास प्रोत्साहन मिळते. उदा. काही दिवसापूर्वी बराच गाजावाजा झालेल्या व्हॅलेंटाईन दिवसाचा फायदा वृत्तपत्रे व व्यावसायिक लोकांना होतो पण त्याचा निरागस

मला- मुलींच्या मनावर काय परिणाम होतो याचा कोणीच विचार करीत नाही. शिवाय सर्व प्रकार भारतीय, विशेषतः महाराष्ट्रीय संस्कृतीच्या विरोधात आहेत पण त्याची कोणालाच पर्वा दिसत नाही. या वातावरणावरून असे दिसते की, परंपरागत सुसंस्कारांचा प्रभाव आता भौतिकतेच्या भडिमारापुढे टिकाव धरू शकत नाही. यामुळे सर्वसामान्य लोकांना अनेक अडचणींना व त्रासांना तोंड द्यावे लागते. या सर्व परिस्थितीमध्ये माणसाचे चित्त आंतरमुख होऊन आत्मतत्त्वात उतरल्यास त्यांना शाश्वत आनंदाचा लाभ होऊ शकतो तसे झाल्यास ऐहिक गोष्टींच्या पासून सुख प्राप्तीचाहव्यास कमी होईल आपल्या देशात जन्मलेल्या महान ऋषि-मुनि, संतांनी लिहीलेल्या संस्कृत व इतर भाषातील ग्रंथामध्ये आत्मसाक्षात्काराचे महत्त्व वर्णिले आहे. सर्वांना आत्मसाक्षात्कार मिळावा ही कदाचित परमेश्वरी योजना असावी. कारण त्याची सर्व व्यवस्था चक्रे व नाड्या यांच्या यंत्रणे द्वारे व कुंडलिनि शक्तीच्या रूपाने आपल्या मध्येच आहे. भारताचा प्राचीन वारसा असलेल्या कुंडलिनि योगाला परम पूज्य श्री माताजी निर्मला देवी यांनी सर्व सामान्य जनांना साधना करता येईल असे सोपे स्वरूप दिले आहे. त्यामध्ये कुलंडलिनि शक्तिची जागृती विनासायास होऊ शकते. साधकास कोणताही त्रास होत नाही. श्री माताजींच्या देश-विदेशातील प्रवचनाच्या कार्यक्रमात हजारो लोकांची कुंडलिनी शक्ति एका वेळी जागृत होऊन त्यांना आत्मसाक्षात्काराचा आल्हाददायक अनुभव मिळतो.

प्रथम इडा व पिंगला नाड्यांमध्ये, म्हणजे मानसिक भावनिक व बौद्धिक अंगामध्ये संतुलन प्रस्थापित होते आणि कुंडलिनि शक्तिचे सुषुम्ना मार्गातून उत्थान होते. षटचक्रे पार करून कुंडलिनि शक्ति मस्तकातील सहस्त्रार चक्रात येते. वेळी अहंकार व मन (प्रति अहंकार) या विचार निर्माण करणाऱ्या संस्था फुग्यातील हवा गेल्यावर तो लहान होतो, तद्वत लहान होतात, चित्त आंतरमुख होते. निर्विचारता येते व "तदा द्रष्टु स्वरूपे व स्थानम् ।" या पातंजल योग सूत्राप्रमाणे आत्म्याच्या अविष्काराची अनुभूती प्राप्त होते.परमेश्वराच्या सर्वव्यापी शक्तिच्या चैतन्य लहरींना दोन्ही तळहातांवर, मस्तकावर, थंड वाऱ्याच्या झुळूकी प्रमाणे शीतल स्पर्श झाल्याचा आल्हाददायक अनुभव येतो.

सहज योगाची साधना केवळ १५-२० मिनिटे सकाळ संध्याकाळ ध्यान करणे इतकीच आहे. आठवड्यात एक दिवस सामुहिक ध्यान करण्याने व्यक्ति लवकर प्रस्थापित होऊन सहज योगाचे लाभ मिळू शकतात. कुंडलिनी शक्तिच्या संचलनामुळे चक्रांची स्थिती सुधारते ती विकसित होतात तसे त्यांच्याशी संलग्न असणाऱ्या शारिरीक यंत्रणांचे आरोग्य सुधारते तसेच प्रत्येक चक्रांमुळे मिळणारे सद्गुण जागृत होऊन विचार, आचरण व संपर्क यांच्याद्वारे दिसून येतात. स्वभाव व क्षमाशील व उदार होऊन नाते-संबंध, सुधारतात. कौटुंबिक जीवनात आनंदाचे वातावरण रहाते. पति-पत्नीच्यात परस्परांबद्दल प्रेमाचे व सन्मानाचे संबंध रहातात.

व्यवसाय अथवा नोकरी यांच्यात प्रगतीसाठी आवश्यक असणारे कार्यशीलता (एफिशियन्सी) सृजनशीलात (क्रिएटिव्हीटी) संतुलित निर्णय क्षमात, आत्मविश्वास एकाग्रता, आकलन शक्ति वगैरे गुण विकसीत होता.

सहज योगात जाती, धर्म, वंश, राष्ट्रीयत्त्व इत्यादिवर आधारित भेदभाव मान्य नाहीत. किंबहुना जगाच्या विविध भागांमध्ये जन्मलेल्या सर्व प्रेषितांच्या विषयी सहज योग्यांना पूज्य भाव असतो. मानवामध्ये, जन्मतःच असणारे अंगभूत सद्गुण म्हणजे धर्म, जसे निष्कलंक रहाणे हा सोन्याचा गुणधर्म तसे सद्गुणांचे आचरण मानवाचा धर्म आहे. जो धारण केला जातो तो धर्म या सद्गुणांचे आचरण करावे हीच प्रत्येक धर्माची शिकवण आहे. सहज योग्यांना हे सर्व ध्यान धारणेतून आपोआप समजते व त्या प्रमाणे त्यांचे आचरण असते.

सहज योग साधनेने मानवी जाणीवेत एक नवीन क्षेत्र

(डायमेन्शन) विकसित होते. त्याला सामुहिक चेतना असे म्हणता येईल. चित्त आंतरिक चेतनेत गेल्यामुळे ते दुसऱ्याच्या कुंडलिनिकडे गेल्यास त्या व्यक्तिच्या कुंडलिनि व चक्रांच्या स्थितीची दोन्ही हातांच्या बोटांवर चैतन्य लहरींच्या माध्यमातून जाणीव होऊ शकते. चक्रांच्या स्थितीमध्ये कशी सुधारणा करावयाची याचेही ज्ञान श्रीमाताजी निर्मला देवी यांनी सहज योग्यांना दिले आहे. ही प्रेमाची शक्ति इतकी महान व कार्यक्षम असते की, केवळ हाताच्या बोटांच्या हालचालींनी हजारोंची कुंडलिनि शक्ति हालविता येते आणि इतरांना मार्गदर्शन करता येते.

सहज योग्यांना सुद्धा स्वतःच्या चक्रांमधील दोष हातांच्या बोटांवरील चक्रांच्या स्थानावर समजतात. स्वतःच्या शारिरीक, मानसिक स्थितीची ती वस्तुनिष्ठ जाणीव असते. चक्रांमधील दोष स्वतःलाच काढून टाकता येतात. चक्रे स्वच्छ ठेवण्याने वैयक्तिक जीवनातील अनेकविध त्रास कमी होतात, हा जगभरच्या हजारो सहज योग्यांचा अनुभव आहे. त्याच प्रमाणे व्यक्तिमत्त्व विकासही साधता, जमिनीत रोपण केलेल्या बीजाने अंकुरित होऊन वृक्षात नैसर्गिकरित्या वृद्धिंगत व्हावे तशी ही क्रिया आपोआप घटित होते. माळी झाडांना पाणी घालतो व लक्ष ठेवतो तसेच सहजयोग साधकाने नियमित ध्यानाने आपल्या चक्रांची स्वच्छता ठेवायची प्रगती विनासायास घडून येते.

सहज योग्यांना सतत जाणविणाऱ्या शीतल चैतन्य लहरींचे विशेष महत्त्व आहे. कारण चैतन्य लहरी म्हणजेच परम चैतन्य, परमेश्वराची सर्वव्यापी प्रेमशक्ति, आदि शंकराचार्य आणि इतर महान ऋषि-मुनि यांनी आपल्या संस्कृत ग्रंथात यांचे स्फुरण, स्पंद असे वर्णन केले आहे "यस्यवै स्फुरणं सदात्मकं असत्कल्पार्थगं भासते" (दक्षिणामूर्ति स्तोत्र) शिवसूत्राच्या पहिल्या श्लोकात श्री शंकराच्या चैतन्याचे वर्णन" स्वाच्छन्द्यानन्द वृन्दोच्छलद मृतभयानुत्तरस्पन्दतत्त्वम् ।" असे केले आहे.

श्री समर्थ रामदासांनी दासबोधात मूळ मायेचे वर्णन केले आहे. त्याचेवरून शीतल वायूस्वरूप चैतन्य लहरी म्हणजेच मूळमायेचा अविष्कार आहे हे लक्षात येते.

ब्रम्हा मूळमाया जाली । तेचि अष्टधा प्रकृति बोलिली ।
भूती त्रिगुणी कालावली । मूळमाया ।।
ते मूळमाया वायोस्वरूप । वायोमध्ये जाणीवेचे रूप ।
तेचि इच्छा परी आरोप । ब्रम्हीं न घडे ।।

सहजयोग साधनेचे आरोग्य विषयक लाभ शास्त्रीय संशोधनात सिद्ध झाले आहेत. दिल्ली येथील डॉ. उमेश चंद्र राय, डॉ. दीपक चुघ, डॉ. संदिप सेठी यांनी केलेल्या संशोधनात असे सिद्ध झाले आहे की सहज योग साधना मानसिक तणावांमधून उद्भवणारे विकार (स्ट्रेस डिसॉर्डर) हायपरटेन्शन, दमा, इत्यादी विकारावर प्रभावी उपाय योजना होऊ शकते. या शोध निबंधाचे अनेक आंतरराष्ट्रीय वैद्यकिय परिषदांमध्ये वाचन झाले आहे. तसेच इंटरनॅशनल मेडिकल जर्नलस मध्ये हे निबंध प्रसिद्ध झाले आहेत. सहज योग साधनेमुळे अनेकांचे मनोदहिक विकार बरे झाले आहेत. मुंबई येथे जवळ सी. बी. डी. येथे सहज योग माहिती व आरोग्य विषयक संशोधन केंद्र स्थापन झाले आहे. रशियामध्ये सहज योगावर फार मोठ्या प्रमाणावर शास्त्रीय संशोधन होत आहे. त्यात परम पूज्य श्री माताजींचे फोटोतून प्रवाहित होत असलेल्या चैतन्य लहरींची तीव्रता मोजण्यात आली. सहज योग ध्यान करीत असलेल्या व्यक्तिच्या मेंदूच्या अवस्थांचा संगणकाच्या सहाय्याने अभ्यास केला आहे.

कृषिक्षेत्रातही सहज योगाचे लाभ दिसून आले आहेत. चैतन्य लहरी मिश्रीत पाणी शेतीवर दिल्यास अथवा चैतन्य लहरी दिलेली बियाणांची पेरणी केल्यास तीस ते चाळीस टक्के कृषी उत्पादन वाढते असे अनेक शेतकऱ्याचा अनुभव आहे. ऑस्ट्रीया देशातील संयुक्त राष्ट्र संघटेचे माजी कृषि सल्लागार डॉ. हमीद नाशिकचे डॉ. रमेश संघवे, पुण्याचे संशोधक श्री. मंगेश देशमुख यांनी केलेल्या

संशोधनात सहज योगाचे लाभ सिद्ध झाले आहेत. सहज योगाने लाभ बिझीनेस मॅनेजमेंट, मानव संपत्ती विकास (एच. आर. डी) संपूर्ण गुणात व्यवस्थापन (टी. क्यू. एम) इत्यादी क्षेत्रातही होऊ शकतात.

मानवी उत्क्रांतीच्या सर्वोच्च शिखरावर सर्वसामान्यनांना उन्नत होण्याचा मार्ग म्हणजे सहज योग. अशा अद्वितीय सहज योगाच्या निर्माण कर्त्या परमपूज्य निर्माणकर्त्या परमपूज्य श्री माताजी निर्मला देवी सुद्धा एकमेवा द्वितीय आहेत. "तुम्हीच स्वतःचे गुरू आहात मी तुमची आई आहे" असे सांगणाऱ्या श्री माताजी जगातील सर्व सहज योग्यांवर स्वतःच्या मुली व नातवंडे यांच्या इतकेच प्रेम करतात. त्यांच्या अध्यात्मिक प्रगतीवर, आरोग्यावर लक्ष ठेवतात कोणता आहार कोणत्या प्रकृतीच्या सहज योगांना घ्यावा ह्याच्या सूचना करतात घरगुती व आयुर्वेदिक औषधे सुचवितात. कुटूंब प्रमुखाप्रमाणे त्या विवाह जुळवितात. सहज योगात हुंडा घेण्याच्या प्रथेस विरोध आहे. पासष्ट देशातील परदेशी सहज योगी तरूण मुले-व मुली हिंदू विवाह पद्धतीनेच (मंगलाष्टके, लाजाहोम, सप्तपदी वगैरे) लग्न करतात. दरवर्षी आंतरराष्ट्रीय सहज योग सेमिनारमध्ये शेकडो आंतरराष्ट्रीय विवाह या पद्धतीने संपन्न होतात.

परम पूज्य श्री माताजी जगभरच्या सहज योग्यांना भेटून मार्गदर्शन करण्यास तसेच सहज योगाचे लाभ अधिक अधिक लोकांचे पर्यंत जावेत याचेसाठी वयाच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षीसुद्धा अव्याहत परिश्रम करतात. परम पूज्य श्री माताजींच्या मार्गदर्शनाखाली सहज योग साधना केल्याने ज्यांच्या जीवनात परिवर्तन घडून परिपूर्ण जीवनाचा लाभ झाला आहे, क्षमाशील, प्रेमळ, कलात्मक आनंदी पण समर्थ व्यक्तिमत्त्वाचा लाभ झाला आहे असे जगभर अगणिक लोक आहेत. त्या सर्वांचे त्यांच्या अध्यात्मिक मातेवर श्री माताजींवर अमर्याद प्रेम आहे. श्री माताजींच्या प्रेमाला व कार्याला देश, भाषा कशाच्याही मर्यादा नाहीत परदेशी सहज योग्यांना इंग्रजी भाषा येत नसली तरी त्यांचे श्रीमाताजींवर स्वतःच्या आईपेक्षाही अधिक प्रेम आहे. श्रीमाताजींनी परदेशी सहज योग्यांना भारतीय शास्त्रीय संगीत कला, इतिहास, संस्कृती यांच्याशी अवगत केले आहे. महाराष्ट्रातील श्री ज्ञानेश्वर श्री रामदास आदि संतांची शिकवण, छत्रपति शिवाजी महाराजांचे कार्य महाराष्ट्राची अध्यात्मिक परंपरा या सर्वांच्या विषयी पाश्चात्य सहज योग्यांना फार आदर आहे. त्याचप्रमाणे वाईट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, अगुरू, यांच्यावर श्रीमाताजी परखडपणे टीका करतात. मग त्या कोणत्याही देशातील असोत. त्या म्हणतात "मी तुमची आई आहे, तुमच्या हिताचे आहे ते मी सांगणारच मी काही तुमची मते मागण्यास आले नाही"

श्रीमाताजी सहज योगाशिवाय इतर अनेक विषयांवरही समर्थपणे अचूक विनाविलंब मार्गदर्शन करतात. प्रत्येक विषयावरील त्यांचे प्रभुत्त्व पाहून मन थक्क होते. श्रीमाताजींच्या सान्निध्यातील थोड्या काळातसुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू लक्षात येतात. प्रत्येक वेळी एक नवीन अनुभव येतो. त्याचे विषयी लिहितांना "क्व चाल्प विषया मति" असे वाटते आणि संत तुकाराम महाराजांचा अभंग आठवतो.

**काय वानू आता । न पुरे ही वाणी ।**

**मस्तक चरणी ठेवितसे ।**

✪

